सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

जानेवारी २०२४ । पृष्ठे : ५२

# महाराष्ट्र आरोग्य पत्रिका




कार्य आरोग्य सेवेचे
यशस्वी जनसेवेचे !!

# आरोग्य हा सर्वसामान्य माणसाचा मूलभूत अधिकार

– प्रा. डॉ. तानाजी सावंत, आरोग्य मंत्री

## वालवड येथे रुग्णालय इमारतीचे भूमिपूजन



**धाराशिव** - ग्रामीण भागात चांगली आरोग्य सुविधा मिळावी हा ग्रामस्थांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असतो. त्यामुळेच आरोग्य हा सर्वसामान्य नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालक मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी केले.

दि. 9 जानेवारी रोजी भूम तालुक्यातील वालवड येथील 30 खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे भूमिपूजन पालक मंत्री प्रा. डॉ. सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. इस्माईल मुल्ला, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, भूमच्या उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, तहसीलदार सचिन खाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अमोल शिनगारे व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहन बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. सावंत म्हणाले, या रुग्णालयाच्या भूमिपूजनामुळे भविष्यात इमारत उभी राहिल्यावर नागरिकांना हक्काचे रुग्णालय मिळणार आहे. या रुग्णालयात सर्व अत्यावश्यक आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. येत्या सहा-सात महिन्यात या रुग्णालयाचे काम पूर्ण होईल. 15 ऑगस्ट 2024 रोजी या रुग्णालयाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. रुग्णालयात सर्व प्रकारच्या त्या आवश्यक सुविधा, चाचण्या व उपचार केले जातील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी मोहीम राबविण्याची सूचना केली आहे. या अनुषंगाने राज्यातील 2 हजार 146 शासकीय रुग्णालयास सर्व आवश्यक सुविधा आणि तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले जात आहे. गोरगरीब नागरिक, शेतकरी बांधव व कष्टकरी बांधव यांना सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आरोग्य विभाग पूर्ण ताकदीने काम करत आहे.

यावेळी पालकमंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी उपस्थित आशा सेविकांना संबोधित करून त्यांच्या मागण्या संदर्भात शासन सकारात्मक असल्याचे सांगत उपस्थित अंगणवाडी सेविकांना शासन आणि जनतेला वेठीस न धरण्याचे आणि कामावर रुजू होऊन संप मागे घेण्याचे आवाहन केले.

या भूमिपूजन सोहळ्यात वालवड व पंचक्रोशीतील ग्रामस्थ व आशा वर्कर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन


मुख्य संपादक/प्रकाशक
**डॉ. कैलास बाविस्कर**
उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

संपादन सहाय्य
**डॉ. संजयकुमार जठार**
सहायक संचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

**अशोक निम्मलवार**
प्रशासकीय अधिकारी

**मुद्रण**
**कल्याणी कार्पोरेशन, पुणे**
१४६४, मंगेशश्री, रेणुका स्वरूप स्कूल लेन,
सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.



पत्रव्यवहारासाठी पत्ता

संपादक,
**राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग**
'परिवर्तन', आरोग्य भवन परिसर,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६.
दूरध्वनी : ०२०-२६६१०१७८,
२६६१०१७९.
फॅक्स : ०२०-२६६१०१८०

e-mail :
arogyapatrikamh@gmail.com


वार्षिक वर्गणी
५०/- रुपये

# महाराष्ट्र आरोग्य पत्रिका


वर्ष : पंचविसावा | अंक : ०१ | महिना : जानेवारी २०२४





## कार्य आरोग्य सेवेचे यशस्वी जनसेवेचे !!

## मोबाईल हेल्थ

/MahaArogyaIECBureau @Mahahealthiec @Mahahealthiec @Mahahealthiec

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे द्वारा प्रकाशित

https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau

https://twitter.com/MahaHealthIEC

https://www.instagram.com/mahahealthiec/

http://bit.ly/MahaArogyaYT

https://www.linkedin.com/company/maha-arogya-iec-bureau

संकेत स्थळ :
http.//maha-arogya.gov.in
http.//mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र आरोग्य पत्रिका

जानेवारी - २०२४

# अंतरंग


मा. आरोग्य मंत्री संदेश ..... ५
आयुक्तांचे मनोगत ..... ६
संपादकीय ..... ७
नव्या वर्षाचे नवे चैतन्य-नवी उभारी ! ..... ८
पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन अभियानाचा शुभारंभ ..... ११
केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. मनसुख मंडाविया यांची राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी मुंबई येथे घेतली सदिच्छा भेट! ..... १२
आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये क्षयरोग निदानासाठी ट्रूनॅट मशिन ..... १३
मा. राज्यपाल रमेशजी बैस यांच्याकडून राज्य व केंद्र पुरस्कृत आरोग्य योजनांचा आढावा ..... १५
केंद्र सरकारकडून निधी कमी पडू दिला जाणार नाही ..... १६
माता सुरक्षित तर घर सुरक्षित ..... १८
“आभा”कार्डचे राज्यस्तरीय लोकार्पण ..... २०
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे विमा संरक्षण पाच लाख रुपये ..... २२
आशा स्वयंसेविकांच्या मानधनात वाढ ..... २३
जनऔषधी दिन 2023 ..... २५
आरोग्य दिनदर्शिका ..... २६
आपला दवाखाना ..... २८
महाआरोग्य शिबिर ..... ३०
“महारक्तदान” शिबीराचे आयोजन ..... ३१
मानसिक स्वास्थ्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे कार्यान्वित ..... ३१
विशेष महाआरोग्य शिबिर ..... ३१
“एक व्यक्ती एक पद” या योजनेची अंमलबजावणी ..... ३१
राज्यातील शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे बदल्या ..... ३२
शासकीय जिल्हा रुग्णालये व विविध आरोग्य संस्थांची बांधकामे ..... ३२
लिथोट्रीप्सी उपचार ..... ३२
कर्करोगावरील किमोथेरपी - डे केअर सेंटर ..... ३२
महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना ..... ३३
हृदयरोग रुग्णांसाठी कार्डियाक कॅथलॅब ..... ३३
देशात महाराष्ट्र आरोग्य सेवेत अग्रेसर ..... ३३
कॅन्सर व्हॅन ..... ३३
‘मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र अभियान’ ..... ३३
धाराशिवला ‘फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय’ ..... ३४
सुंदर माझा दवाखाना ..... ३४
मिशन मेळघाट ..... ३४
फिल्म फेस्टिव्हल 2023 ..... ३५
आरोग्याची वारी पंढरीच्या दारी ..... ३५
राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम (राक्षदूका) ..... ३७
गोष्टीतून आरोग्य शिक्षण -जनाआजीचा सल्ला ..... ३८
डायबेटीस आणि पावलांची काळजी ..... ३९
आशा संवाद ..... ४१
कविता ..... ४५
वृत्त विशेष ..... ४७
लेखकांना विनंती ..... ५०




१२ केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. मनसुख मंडाविया यांची राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी मुंबई येथे घेतली सदिच्छा भेट!



१५ राज्यपाल मा. रमेश बैस यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत



२० “आभा”कार्डचे राज्यस्तरीय लोकार्पण

# मा. आरोग्य मंत्री संदेश




सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने गेल्या वर्षभरात समाजोपयोगी अनेक आरोग्यविषयक उपक्रम व मोहिमा आखल्या गेल्या. या मोहिमांमध्ये सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून जास्तीत जास्त लोकांपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करण्यात आले. यामध्ये 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' तसेच 'जागरूक पालक, सुदृढ बालक', 'सुंदर माझा दवाखाना', हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना', जन औषधी विषयक उपक्रम तसेच महाआरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य सेवा, आयुष्मान भारत अशा विविध मोहिमांच्या द्वारे सामान्यांपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यामध्ये सार्वजनिक आरोग्य सेवेला चांगल्यापैकी यश मिळाले आहे.

आरोग्य विभागाच्या या यशामध्ये सर्वांचा सहभाग व सर्वांचे सहकार्य मोलाचे ठरले. या टीमवर्क भावनेमुळे सार्वजनिक आरोग्य सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मदत झाली. याचा लाभ माता-भगिनी व गरजूंना झाला. सार्वजनिक आरोग्य सेवेत माता आरोग्य तसेच दूर दुर्गम भागासाठी विशेष उपक्रम सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राबविले जातात. या उपक्रमांना अधिक बळकटी देण्याचे काम मागील वर्षात मोठ्या प्रमाणावर झाल्याचे आपल्या लक्षात येते. यामध्ये सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करणा-या सर्वांचा सक्रिय सहभाग हा मोलाचा कणा होय. यामुळे सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम व अधिक लोकाभिमुख होण्यासाठी सर्वांचा सक्रिय सहभाग फार मोलाची आणि महत्त्वाची बाब आहे. राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणारे आरोग्य विषयक उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र काम करूया व सुदृढ महाराष्ट्र घडविण्यामध्ये आपले सर्वांचे योगदान योगदान देऊया.

**प्रा. डॉ. तानाजी सावंत**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

# आयुक्तांचे मनोगत



राज्यातील जनतेला दर्जेदार, परिणामकारक व मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग कटिबध्द आहे. दिनांक १५ ऑगस्ट २०२३ पासून विभागांतर्गत येत असलेल्या सर्व जिल्हा रुग्णालये व इतर आरोग्य संस्थांमध्ये राज्यातील सर्व नागरिकांना मोफत वैद्यकीय उपचार देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक कुटुंबांना व अधिवास प्रमाणपत्रधारक कुटुंबांना लागू करण्याचा तसेच प्रति कुटुंब वार्षिक विमा संरक्षण रु. १.५० लाख रकमेवरुन रु. ५.०० लाख पर्यंत वाढविण्याचा निर्णयदेखील घेण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राष्ट्रीय सिकल सेल निर्मूलन हे महात्त्वाकांक्षी अभियान राबविण्यात येत असून या अभियानांतर्गत आजवर राज्यातील २०,११,७८३ नागरिकांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी ११,५८० इतके सिकल सेल आजाराचे रुग्ण आढळून आलेले आहेत. सिकल सेल रुग्ण तपासणीसाठी राज्यात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर मोहीम राबविण्यात आली आहे. आयुष्मान भारत डिजिटल मिशन या मोहिमेंतर्गत राज्यात जवळपास साडेचार कोटी नागरिकांना आयुष्मान भारत आरोग्य खाते कार्ड देण्यात आलेली आहेत.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून राज्यातील आरोग्य सेवेला बळकटी प्राप्त झालेली असून माता व बाल आरोग्या बरोबरच असंसर्गजन्य आजारांसाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. साथीच्या आजारांबरोबरच समाजात सध्या वाढत असलेल्या कर्करोग, डायबेटीज, हायपरटेन्शन यांसारख्या असंसर्गजिन्य आजारांच्या बाबतीत दक्षता घेतली जात आहे. रुग्णांना वेळेत निदान व आवश्यक उपचारही वेळेत मिळणे गरजेचे आहे. यासाठी नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच तातडीने वैद्यकीय उपचार सुरु करणे हितावह आहे. जानेवारी महिन्यात कर्करोग जनजागृती, कुष्ठरोग निवारण दिन तसेच धूम्रपान विरोधी दिन साजरे होत आहेत. युवकांमधील वाढत चाललेले धूम्रपान आज चिंतेचा विषय असून त्यांना व्यसन व धूम्रपानापासून परावृत्त करण्याचे मोठे आव्हान आज आपणा सर्वांसमोर आहे. शालेय व महाविद्यालयीन मुलांना या व्यसनांपासून दूर ठेवण्याची मोठी जबाबदारी मुख्यत्वे पालक व शैक्षणिक संस्थांची आहे.

राज्यातील नागरिकांना शासकीय रुग्णालयांमध्ये उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने राज्यात १२ ठिकाणी जिल्हा रुग्णालयांमध्ये कॅथलॅब सुविधा, १७ ठिकाणी एमआरआय सुविधा व ६३ जिल्हा उपजिल्हा रुग्णालयांत डायलिसिस सुविधा विभागामार्फत सुरु करण्यात येत आहेत.

सर्वसमावेशक आरोग्य सुविधा प्रदान करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या १८ वर्षावरील महिलांच्या 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियानांतर्गत ४.३९ कोटी महिलांची, ०-१८ वयोगटातील बालकांसाठीच्या 'जागरुक पालक, सुदृढ बालक' अभियानांतर्गत एकूण २.१८ कोटी बालकांची आणि १८ वर्षावरील सर्व पुरुषांची सर्वांगिण तपासणीचे 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' उपक्रमांतर्गत आजवर २.५८ कोटी पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. सहज, सुलभ व परिणामकारक आरोग्य सेवा राज्यातील सर्व स्तरातील घटकांपर्यंत पोहोचावी व त्याचा लाभ अधिकाधिक गरजू लोकांना मिळावा यासाठी राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे

**श्री. धीरज कुमार**
आयुक्त, आरोग्य सेवा तथा
अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,
महाराष्ट्र राज्य

# संपादकीय

'संकल्प निरोगी महाराष्ट्रा'चा या ध्येयाने शासनाच्या वतीने सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून वेगवेगळ्या योजना व उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहेत. समाजाचे, कुटुंबाचे व प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी शहरापासून ते गाव पातळीपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी राज्य शासनातर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. सार्वजनिक आरोग्य सेवेच्या माध्यमातून लोकांना आरोग्य सुविधा अधिक सक्षम व दर्जेदार पुरविण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

गेल्या वर्षभरापासून अनेक महत्त्वपूर्ण वेगवेगळे निर्णय आणि उपक्रम राज्यात राबविण्यात आलेले आहेत. यात प्रामुख्याने सर्व नागरिकांना मोफत उपचार, आशा स्वयंसेविकांच्या मानधनात वाढ, प्रत्येकासाठी आभा कार्ड तसेच पाच लाख रुपयांपर्यंतचा विमा, गोल्डन हेल्थ कार्ड, महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा, आषाढी वारी निमित्त आरोग्य शिबिरे, तसेच महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण स्थापना, महारक्तदान शिबिरे, सिकलसेल निर्मूलन अभियाना अंतर्गत सिकलसेल तपासणी, वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार, आरोग्य शिक्षणासाठी महाआरोग्य फिल्म फेस्टिवल तसेच पारदर्शकतेसाठी ऑनलाइन पोर्टलद्वारे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या, जिल्हा रुग्णालय व विविध आरोग्य संस्थांची बांधकामे, सुंदर माझा दवाखाना, तसेच लिथोट्रीप्सी उपचार, कर्करोग किमोथेरपी डे केअर सेंटर व कॅन्सरव्हॅनच्या माध्यमातून आरोग्य सुविधा पुरविण्यात येत आहेत. देशात महाराष्ट्र अग्रेसर असून राष्ट्रीय स्तरावर पुरस्कारही महाराष्ट्राला प्राप्त झाले आहेत, मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र, हृदयरोग रुग्णांसाठी कार्डियाक कॅथलॅब, ग्रामीण रुग्णांसाठी फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय, नवीन मानसिक स्वास्थ्य व व्यसनमुक्ती केंद्र, तसेच क्षयरोग मुक्तीसाठी क्षयरोगमुक्त महाराष्ट्र अभियान, माता आरोग्यासाठी 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित', बालकांसाठी 'जागरूक पालक- सुदृढ बालक' तर तरुणांसाठी 'निरोगी आरोग्य तरुणाईचे वैभव महाराष्ट्राचे' असे विविध उपक्रम शासनाच्या वतीने राबविण्यात आले आहेत. सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून निरोगी महाराष्ट्राच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभाग वाटचाल करतो आहे. या सर्व योजनांना समाजाचाही मोठा सहभाग लाभतो आहे. या अंकात या उपक्रमांविषयी लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आलेली आहे. लोकसहभागातूनच आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार असल्यामुळे निरोगी समाज घडविण्यासाठी या योजनांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे.

आपण सर्वांनी शासनाच्या प्रत्येक योजनेची माहिती लोकांपर्यंत पोहोचवून त्या समाजात अधिक गतिमान करण्यासाठी व आरोग्य सेवेला अधिक सक्षम, दर्जेदार व विश्वासार्ह करण्यासाठी आपला सहभाग नोंदवू या व महाराष्ट्र राज्याला निरोगी ठेवण्यात आपली भूमिका पार पाडू या. प्रत्येकाचा सहभाग हा विकासासाठी आवश्यक असल्यामुळे आपण आपली भूमिका अधिक चांगल्या प्रकारे बजावून आरोग्य सेवेला अधिक सक्षम करू या व महाराष्ट्राला निरोगी ठेवू या.

संपादक
**डॉ. कैलास बाविस्कर**

# नव्या वर्षाचे नवे चैतन्य-नवी उभारी !

वैभव मोहन पाटील
कक्ष अधिकारी (अभियान संचालक कक्ष)

सन 2024 या नव्या कोऱ्या करकरीत वर्षात आपण पदार्पण करत आहोत. नवीन वर्ष साजरे करण्याच्या अनेक देशी विदेशी पद्धती आपल्या समाजात दृढ आहेत. कुणी फिरायला शहर सोडून बाहेर पडतो, कुणी कुटुंबासह दिवस घालवतो, अगदीच हौशी मंडळी मित्रमंडळीसह या दिवसाचे सेलिब्रेशन करतो तर काही नव्या वर्षाचे विविध संकल्प सोडून नववर्षाचे स्वागत करतात. एखादा नवा उद्योगधंदा सुरू करण्याचा पण केला जातो, नवे घर, गाडी विकत घेण्याचा संकल्प किंवा दररोजच्या जीवनात ठराविक गोष्ट खाणे सोडणे, वागणे, बोलणे, चालणे यात बदल करण्याचा देखील संकल्प केला जातो. मात्र माणसाच्या आयुष्यात सर्वात महत्वाची गोष्ट आहे ती म्हणजे त्याचे आरोग्य. आरोग्य व्यवस्थित असेल तर त्याला हव्या त्या गोष्टी मिळवण्यात फारशा अडचणी उदभवत नाहीत त्यामुळेच आपले आरोग्य नीट सांभाळण्याचा संकल्प प्रत्येकाने नव्या वर्षात करायला हवा असे माझे मत आहे.

नव्या वर्षाकडून आपल्यापैकी प्रत्येकाला अनेक आशा असतात. अनेक प्रकारची नियोजने केलेली असतात. मात्र, आपले नियोजन तेव्हाच यशस्वी होते, जेव्हा आपण तंदुरुस्त आणि निरोगी राहू. आपले शरीर निरोगी राहावे असे प्रत्येकाला वाटते. त्यासाठी आपण प्रयत्नशील असतो. मात्र आजच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्य सुदृढ राखण्यासाठी आवश्यक असलेला वेळ आपल्याला मिळत नाही हेदेखील तितकेच खरे आहे. तुमचं आरोग्य चांगलं असेल तरच तुमचं मानसिक स्वास्थ्य व दैनंदिन जीवनातील आत्मविश्वास देखील चमकदार असतो. म्हणून आरोग्यदायी असणं महत्त्वाचं. यासाठी काही आरोग्यदायी संकल्प आपण आज सोडायलाच हवेत.



मानसिक आरोग्य आणि सुंदरता या दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत. राग, ईर्ष्या, गर्व किंवा नकारात्मकता मनात असेल तर ते चेहऱ्यावर प्रतिबिंबीत होते. त्याचबरोबर ताण, तणाव, नैराश्य, चिंता यामुळे चेहरा निस्तेज दिसू लागतो. म्हणून मानसिक स्वास्थ्य चांगले असणे गरजेचे आहे. नवीन वर्षात मानसिक स्वास्थ्य चांगले राखण्यासाठी सतत प्रयत्नशील रहा. तुम्हाला आनंद देणारी चांगली कामे करा. तुमचे छंद जोपाला. नवीन ठिकाणी फिरायला जा. त्यामुळे तुमचे मन आनंदी होईल आणि तो आनंद तुमच्या चेहऱ्यावर नक्कीच दिसेल. ध्यान, विश्वास व श्रद्धा या गोष्टीदेखील खूप महत्त्वाच्या आहेत. ईश्वरी ध्यानामुळे तुमचे मन शांत होईल. राग, द्वेष, भीती, चिंता दूर होऊन मानसिक संतुलन साधण्यास मदत होईल. त्यामुळे आपली सकारात्मकता वाढीस लागेल. मनाचे स्वास्थ्य चांगले राखण्यासाठी तुम्हाला सात्विक आहार घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. असं म्हणतात, यथा अन्नम् तथा मनम्. म्हणून फळे, भाज्या, पालेभाज्या, सुकामेवा यांसारख्या सात्विक आहारामुळे तुमचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहील. परिणामी तुम्ही सजग व आत्मविश्वासाने भरलेले राहाल. म्हणून शक्यतो सात्विक अन्नाचा आहारात समावेश करा.

नव्या वर्षात आणखी आपण काय करायला हवे तर नव्या वर्षापासून नवे विचार आपल्या मनात रुजायला हवेत. आपण निश्चय करायला हवेत मग तो निश्चय दररोज चालायला जायचा असो किंवा व्यायाम करायचा, वा वजन कमी करायचा. पण योग्य विचारांना नियोजनांची साथ मिळाली नाही तर त्या संकल्पांना काही अर्थ राहणार नाही. तुमचेच संकल्प काही दिवसांतच तुमच्याकडूनच मोडीत निघाल्याशिवाय राहणार नाहीत. नेहमी फार मोठे टारगेट ठेवले जाते. उदाहरणार्थ, मी एका महिन्यात 10 किलो वजन कमी करेन. वास्तविकपणे व नैसर्गिकपणे हे नक्कीच शक्य नाही. त्यापेक्षा मी नियमित व्यायाम करून आणि योग्य आहार घेउन शारीरिक स्वास्थासाठी मनापासून प्रयत्न करीन हा निश्चय जास्त योग्य आहे. असे केल्यामुळेच आपण आपल्या ध्येयाकडे वाटचाल करू शकतो. एक वाईट गोष्ट सोडण्याचा निश्चय पूर्ण करणे अवघड आहे. पण त्या तुलनेत चांगले काम करण्याचा निश्चय पाळणे सोपे आहे. त्यासाठी संकल्पांमध्येही ताळमेळ हवा. ते संकल्प जास्त यशस्वी होतात. संकल्प पाळण्यात अपयश आले तर लगेचच तो सोडून देणे योग्य नसून पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसे बघितले तर प्रत्येक दिवस नवाच असतो. 1 जानेवारीला तुमचा जेवण कमी करण्याचा संकल्प पाळला गेला नाही तर 2 तारखेला तो परत सुरू करा. वाटेतच सोडून देऊ नका. उद्यावर ढकलण्याचे कामही करू नका. संकल्पात सातत्य असणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच तो टिकवण्यात परिश्रम व जिद्ददेखील अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे नववर्षाचे आगमन आपल्याला नवीन संकल्पांसाठी चांगली संधी आहे आणि आपले संकल्प आपल्याला आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त असायला हवेत.

**नव वर्षाच्या सर्वांना आरोग्यदायी शुभेच्छा!**



# कार्य आरोग्य सेवेचे यशस्वी जनसेवेचे !!



## संकल्प निरोगी महाराष्ट्राचा !

**मा. ना. प्रा. डॉ. तानाजीराव सावंत**

यांच्या नेतृत्वाखाली

**सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेले**

# महत्त्वपूर्ण निर्णय व राबविलेले उपक्रम

# पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन अभियानाचा शुभारंभ




राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन अभियानाचा शुभारंभ देशाचे यशस्वी पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या हस्ते व राज्याचे आरोग्य मंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत साहेब व मान्यवरांच्या ऑनलाईन उपस्थितीत 1 जुलै 2023 रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या वेळी राज्यातील सर्व जिल्ह्यांतील सुमारे 6200 आरोग्य संस्था स्तरावरील (जिल्हा, उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी) अधिकारी व कर्मचारी ऑनलाईन उपस्थित होते. प्राथमिक आरोग्य केंद्र (HWC) लहान शहादा ता. जि. नंदुरबार येथून मा. आदिवासी विकास मंत्री देखील या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

राज्यात सिकल सेल नियंत्रण कार्यक्रम 2008 पासून 21 जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड, वाशिम, अकोला, छत्रपती संभाजी नगर, रायगड आणि हिंगोली या जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे. सद्यस्थितीत राज्यात एकूण सिकल सेल रुग्ण संख्या 22082 आणि सिकल सेल वाहकांची संख्या 261633 इतकी आढळून आली आहे.

कार्यक्रमाच्या वेळी सिकल सेल रुग्ण व्यक्तींना लाल, वाहक व्यक्तींना पिवळे आणि निरोगी व्यक्तींना पांढरे कार्डाचे वाटप करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी 1,80,000 कार्ड वितरित करण्यात आले. तसेच सर्व आरोग्य संस्थांमध्ये या दिवशी सिकल सेल तपासणी करण्यात आली.

त्याचप्रमाणे आयुष्यमान भारत कार्ड मिळविण्यासाठी या आरोग्य संस्थामधून उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सिकल सेल तपासणी करण्यात आलेल्या व्यक्तींना जेनेटिक कार्डचे या वेळी वाटप करण्यात आले.



# केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. मनसुख मंडाविया यांची राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी मुंबई येथे घेतली सदिच्छा भेट!



आरोग्य विभागाने गेल्या एक वर्षाच्या कालावधीत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम जनसामान्यांच्या सेवेसाठी राबविले आहेत.

यामध्ये माता सुरक्षित तर घर सुरक्षित, जागरूक पालक-सुदृढ बालक, सुंदर माझा दवाखाना, महाआरोग्य शिबिरे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे अनुदान पाच लाखापर्यंत वाढविणे, असे विविध लोककल्याणकारी निर्णय घेऊन आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे.

याविषयीची माहिती पुस्तिका राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी माननीय केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. मनसुख मंडाविया यांना भेट दिली.





# आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये क्षयरोग निदानासाठी ट्रूनॅट मशिन





लोकसहभागातून राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यांसाठी 100 ट्रूनॅट मशिनचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

इंडियन ऑईलच्या माध्यमातून सीएसआर निधीतून हे 100 ट्रूनॅट मशिन आरोग्य विभागाला उपलब्ध करून देण्यात आले आहेत. क्षयरोग निदान लवकरात लवकर करण्यासाठी या मशिनचा उपयोग होणार आहे. राज्याला क्षयरोगमुक्त करण्याच्या मोहिमेसाठी या मशिनमुळे मोठे बळ मिळाल्याचे सांगत राज्याला क्षयरोगमुक्त करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.



मा. राज्यपाल रमेशजी बैस यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना
राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत











# मा. राज्यपाल रमेशजी बैस यांच्याकडून राज्य व केंद्र पुरस्कृत आरोग्य योजनांचा आढावा

सार्वजनिक आरोग्य सेवा क्षेत्रात राबविण्यात येणारे उपक्रम व योजना याविषयीची माहिती घेण्यासाठी राज्याचे राज्यपाल मा. रमेश बैस यांनी राजभवन येथे (दि. 24 जुलै) विशेष बैठक घेतली. राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मा. आयुक्त धीरज कुमार, संचालक डॉ. स्वप्निल लाळे, डॉ. नितीन अंबाडेकर, संतोष व विभागातील अधिकारी यावेळी उपस्थित होते.

या बैठकीत राज्यातील विविध आरोग्य योजनांविषयी माहिती सादर करण्यात आली. यावेळी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, प्रत्येकासाठी आभा कार्ड नोंदणी, सिकल सेल व दुर्गम भागासाठीच्या विशेष योजना यावर चर्चा करण्यात आली व शासकीय योजना अधिक सक्षम करून सामान्य जनतेला शासकीय योजनांचा लाभ व्हावा, यावर विशेष भर देण्याच्या सूचना मा. राज्यपालांनी केल्या.

लोककल्याणकारी निर्णय घेऊन आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे, आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी ही सर्व माहिती मा. राज्यपाल रमेशजी बैस यांना दिली.



# केंद्र सरकारकडून निधी कमी पडू दिला जाणार नाही

- डॉ. भारती पवार, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या योजनासाठी केंद्र सरकारकडून निधी कमी पडून दिला जाणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारतीताई पवार यांनी दिली. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे राज्याचे आरोग्य मंत्री ना. प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्यासह आयोजित संयुक्त आढावा बैठकीत त्यांनी आरोग्य विभागाच्या प्रगतीचा आढावा घेतला. महात्मा फुले जनआरोग्य योजना व पंतप्रधान जनआरोग्य योजनेचा महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना लाभ व्हावा. एकही गरजू रुग्ण आरोग्य सेवा योजनेपासून वंचित राहू नये यासाठी विभागाने सर्वोत्तपरी प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव एन. नवीन सोना, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, वित्त संचालक जयगोपाल मेनन, अधीक्षक अभियंता सौ. नाईक, सहसंचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक सुभाष बोरकर तसेच जनआरोग्य योजनेचे अधिकारी उपस्थित होते.









# माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान

# अभियानाला उदंड प्रतिसाद

## एकूण ४ कोटी ३९ लाख

महिलांची सर्वांगीण आरोग्य तपासणी






• मातृत्वाचा सन्मान हाच आपला अभिमान! •




माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान

30 वर्षावरील **2,57,198** लाभार्थ्यांना **मधुमेहाचे** प्राथमिक निदान व उपचार

**4,19,584** लाभार्थ्यांना **उच्च रक्तदाबाचे** प्राथमिक निदान व उपचार

**27,97,394 गरोदर** मातांची तपासणी

तीव्र **रक्तक्षय** असलेल्या **1,13,229** मातांना आयर्न सुक्रोज

**2,68,889** मातांची **सोनोग्राफी**

30 वर्षावरील **33,977** लाभार्थ्यांना **हृदयासंबंधीत** संशयित लक्षणे

**61,729** लाभार्थ्यांना **कर्करोग** सदृश संशयित लक्षणे

**74,08,117** लाभार्थ्यांना **मानसिक आरोग्य**, **तंबाखू** इ. बाबत समुपदेशन

अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात एकूण **52,294 लाभार्थींवर शस्त्रक्रिया** (लहान आणि मोठ्या) करण्यात आल्या.



# “आभा”कार्डचे राज्यस्तरीय लोकार्पण

- मा. पंतप्रधान यांच्या संकल्पनेतून आयुष्मान भारत डिजिटल अभियान (ABDM) योजनेची सुरुवात
- सर्व नागरिकांना सुरक्षित, सर्वसमावेशक, परवडणारी पायाभूत आरोग्य सुविधा डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणार
- डिजिटल माध्यमाद्वारे आरोग्य विषयक डेटा बेस तयार करून, सर्व आरोग्य सुविधा नागरिकांना सहजपणे उपलब्ध.
- आभा कार्ड हे एक प्रकारे नागरिकांची आरोग्य कुंडली असेल. त्यामुळे आरोग्यविषयक माहिती समजू शकेल व पुढील उपचारासाठी व सरकारी योजनांसाठी त्याचा रुग्णाला फायदा होईल.
- आभा कार्ड लोकार्पण सोहळा दि. 04-10-2022 रोजी त्रिमूर्ति प्रांगण, मंत्रालय, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, मा उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री व आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला.
- 24 डिसेंबर 2023 पर्यंत **4,18,92,307** आभा कार्डची नोंदणी करण्यात आली आहे.










लोकार्पण सोहळा
सार्वजनिक आरोग्य विभाग
आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट (आभा)
प्रत्येक नागरिकासाठी 14 अंकी आरोग्य खाते क्रमांक
शुभहस्ते
मा.ना.श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
प्रा.डॉ. तानाजी सावंत
विनीत

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे विमा संरक्षण पाच लाख रुपये

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य संरक्षण मर्यादा रु. 1.50 लाखांवरुन आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेप्रमाणेच वार्षिक रु. 5 लाख पर्यंत

आता महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांना लागू

मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या खर्चात रु. 2.50 लाखांवरुन रु. 4.50 लाख इतकी वाढ

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांना एकसमान 1356 उपचार

राज्यातील अंगीकृत रुग्णालयांच्या संख्येत 1150 वरुन 1350 इतकी वाढ

रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींसाठी 184 विविध उपचारांसाठी रु. 1 लाख मर्यादेपर्यंत उपचार अनुज्ञेय

**टोल फ्री दूरध्वनी क्रमांक**

१५५ ३८८/ १८०० २३३२ २००

१४५५५/ १८०० १११ ५६५



# आशा स्वयंसेविकांच्या मानधनात वाढ



- राज्यातील आशा स्वयंसेविकांच्या वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.
- आशा स्वयंसेवकांच्या मानधनात 3500/- रु. वरून 5000/- रुपये वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गटप्रवर्तकाचे मानधन रु. 4700/- वरून रु. 6200/- करण्यात आले आहे.
- यामुळे ग्रामीण भागातील आशा व शहरी भागातील आशा स्वयंसेविकांना त्याचा फायदा व प्रोत्साहनही मिळणार आहे.



जागरूक पालक सुदृढ बालक

## बाल आरोग्य तपासणी विशेष मोहीम

**96 हजार 939** शाळा व **98 हजार 339** अंगणवाडीमध्ये आरोग्य तपासणी

**0 ते 6 वर्षे वयोगट - 64 लाख 98 हजार 565** बालकांची तपासणी

**6 ते 10 वर्षे वयोगट - 65 लाख 11 हजार 702** बालकांची तपासणी

**10 ते 18 वर्षे वयोगट - 88 लाख 29 हजार 477** बालकांची तपासणी

**9 लाख 67 हजार 704** बालके आजारी आढळली

**6 लाख 92 हजार 543** बालकांवर त्वरित उपचार

**3 लाख 7 हजार 950** बालके उच्चस्तरीय उपचाराकरिता संदर्भित



# जनऔषधी दिन 2023

प्रधानमंत्री जनऔषधी दिन आणि जागतिक महिला दिनानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे दि. 8 मार्च 2023 रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मा. राज्यपाल रमेशजी बैस यांच्या हस्ते ग्रामीण भागात जनऔषधी केंद्रांचे डिजिटली अनावरण करण्यात आले आणि त्यांच्याशी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधला






सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

# सार्वजनिक आरोग्य विभाग
# महाराष्ट्र शासन

# आरोग्य दिन

## जानेवारी

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ धुम्रपान विरोधी दिन | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ राष्ट्रीय युवा दिन | १३ |
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ प्रजासत्ताक दिन | २७ |
| २८ | २९ | ३० कुष्ठरोग निवारण दिन | ३१ | | | |

## फेब्रुवारी

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | २ | ३ |
| ४ जागतिक कर्करोग दिन | ५ मौखिक आरोग्य दिन | ६ | ७ | ८ | ९ | १० राष्ट्रीय जंतनाशक दिन |
| ११ जागतिक रूग्ण दिन व जागतिक युनानी दिन | १२ प्रजनन आरोग्य जागरूकता दिन | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| २५ | २६ | २७ | २८ | २९ | | |

## मे

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ जागतिक कामगार दिन व हिवताप नियंत्रण सप्ताह | २ | ३ जागतिक दमा दिन | ४ |
| ५ जागतिक प्रसविका दिन | ६ | ७ | ८ जागतिक रेडक्रॉस दिन व जागतिक थॅलेसेमिया दिन | ९ | १० मातृदिन | ११ |
| १२ जागतिक परिचारिका दिन व जागतिक दीर्घकालीन थकवा जागरूकता दिवस | १३ | १४ जागतिक उच्च रक्तदाब दिन | १५ जागतिक कुटुंब दिन व जलजन्य साथरोग जनजागरण अभियान | १६ राष्ट्रीय डेंग्यू दिन | १७ | १८ |
| १९ जागतिक फॅमिली डॉक्टर दिन | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ जागतिक स्क्लेरोसिस दिन |
| २६ | २७ | २८ आंतरराष्ट्रीय महिला आरोग्य दिन, मासिक पाळी स्वच्छता दिन व अतिसार नियंत्रण पंधरवडा | २९ | ३० | ३१ जागतिक तंबाखू विरोधी दिन | |

## जून

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १ हिवताप प्रतिरोध महिना व जनजागरण अभियान |
| २ | ३ | ४ | ५ जागतिक पर्यावरण दिन व राष्ट्रीय फायलेरिया विरोधी दिन | ६ | ७ | ८ जागतिक ब्रेन ट्युमर दिन |
| ९ | १० दृष्टिदान सप्ताह | ११ | १२ | १३ | १४ जागतिक रक्तदाता दिन | १५ जागतिक वृद्ध अत्याचार विरोधी दिन |
| १६ | १७ | १८ ऑटिस्टिक गौरव दिन | १९ जागतिक सिकलसेल दिन | २० | २१ आंतरराष्ट्रीय योग दिन | २२ |
| २३ | २४ | २५ | २६ जागतिक मादक पदार्थ विरोधी दिन | २७ | २८ | २९ राष्ट्रीय संख्याशास्त्र दिन |
| ३० | | | | | | |

## सप्टेंबर

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ पोषाहार सप्ताह | २ | ३ | ४ | ५ राष्ट्रीय शिक्षक दिन व मज्जारज्जू दुखापत दिन | ६ | ७ |
| ८ जागतिक साक्षरता दिन | ९ | १० जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन | ११ | १२ | १३ | १४ |
| १५ | १६ जागतिक ओझोन दिन व जागतिक अस्थिमज्जा दाता दिन | १७ | १८ | १९ | २० | २१ जागतिक अल्झायमर दिन |
| २२ | २३ | २४ | २५ जागतिक औषधनिर्माता दिन | २६ | २७ जागतिक कर्णबधिरता दिन | २८ जागतिक रेबीज दिन |
| २९ जागतिक हृदय दिन | ३० | | | | | |

## ऑक्टोबर

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ रक्तदान दिन व ज्येष्ठ नागरिक दिन व जागतिक शाकाहार दिन | २ स्वच्छता दिन व राष्ट्रीय व्यसनाधिनता प्रतिरोध दिन | ३ | ४ | ५ |
| ६ | ७ जागतिक सेरेब्रल पाल्सी दिन | ८ | ९ जागतिक दृष्टी दिन | १० मानसिक आरोग्य दिन | ११ जागतिक बालिका दिन | १२ जागतिक संधिवात दिन |
| १३ जागतिक थ्रोम्बोसीस दिन | १४ | १५ जागतिक हाताची स्वच्छता जागरूकता दिन | १६ जागतिक अन्न दिन व जागतिक बधिरीकरण दिन | १७ जागतिक आघात दिन | १८ जागतिक रजोनिवृत्ती दिन | १९ |
| २० जागतिक अस्थी विदिर्णता दिन | २१ जागतिक आयोडीन न्यूनता विकार नियंत्रण दिन | २२ | २३ | २४ जागतिक पोलिओ दिन | २५ | २६ जागतिक स्थूलता दिन |
| २७ | २८ | २९ जागतिक पक्षाघात दिन | ३० | ३१ | | |

देऊनी आरोग्य शिक्षण। सुज्ञ करु प्रत्येक जण।। ध्येय एकचि जाण। आरोग्य संपन्नतेचे।।

# दर्शिका २०२४

/MahaArogyaIECBureau @MahaHealthIEC /mahahealthiec /MahaHealthIEC

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

## मार्च

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १ | २ |
| ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ जागतिक महिला दिन | ९ |
| १० गर्भधारणेतील मधुमेह जागरूकता दिवस | ११ | १२ जागतिक मूत्रपिंड दिन | १३ | १४ | १५ | १६ गोवर लसीकरण दिन |
| १७ | १८ | १९ | २० जागतिक मौखिक आरोग्य दिन | २१ जागतिक डाऊन सिंड्रोम दिन | २२ जागतिक जल दिन | २३ जागतिक हवामान दिन |
| २४ जागतिक क्षयरोग दिन | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| ३१ | | | | | | |

## एप्रिल

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ अंधत्व प्रतिबंध सप्ताह | २ जागतिक ऑटीझम जनजागृती दिन | ३ | ४ | ५ | ६ |
| ७ जागतिक आरोग्य दिन | ८ | ९ | १० | ११ जागतिक सुरक्षित मातृत्व दिन | १२ | १३ |
| १४ आयुष्मान भारत – आरोग्यवर्धिनी केंद्र दिन | १५ | १६ | १७ जागतिक हेमोफिलीया दिन | १८ | १९ जागतिक यकृत दिन | २० |
| २१ | २२ पृथ्वी दिन | २३ | २४ जागतिक लसीकरण सप्ताह | २५ जागतिक हिवताप दिन | २६ | २७ |
| २८ | २९ | ३० | | | | |

## जुलै

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ राष्ट्रीय डॉक्टर दिन | २ | ३ | ४ | ५ | ६ जागतिक प्राणीजन्य रोग दिन |
| ७ | ८ | ९ | १० सुरक्षित मातृत्व दिन | ११ जागतिक लोकसंख्या दिन | १२ | १३ |
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| २८ जागतिक कावीळ दिन | २९ क्षारसंजीवनी दिन | ३० | ३१ | | | |

## ऑगस्ट

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ जागतिक स्तनपान सप्ताह | २ | ३ |
| ४ | ५ हत्तीरोग नियंत्रण दिन | ६ जागतिक हिरोशिमा दिन | ७ | ८ | ९ | १० राष्ट्रीय जंतनाशक दिन |
| ११ | १२ जागतिक युवा पंधरवडा | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १८ | १९ | २० जागतिक डास दिन | २१ | २२ | २३ | २४ |
| २५ राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ |

## नोव्हेंबर

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १ | २ |
| ३ | ४ | ५ | ६ | ७ राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिन | ८ | ९ |
| १० जागतिक लसीकरण दिन | ११ | १२ जागतिक न्यूमोनिया दिन | १३ जागतिक प्रतिजैविके जागरूकता दिन | १४ बाल दिन व जागतिक मधमेह दिन | १५ नवजात बालक काळजी सप्ताह | १६ |
| १७ जागतिक अपस्मार दिन | १८ | १९ जागतिक दीर्घकालीन श्वासावरोध विकार दिन व जागतिक शौचालय दिन | २० | २१ | २२ | २३ |
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० |

## डिसेंबर

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ जागतिक एड्स दिन | २ भोपाळ दुर्घटना दिन व राष्ट्रीय प्रदूषण प्रतिबंध दिन | ३ जागतिक दिव्यांग दिन | ४ | ५ | ६ | ७ |
| ८ | ९ जागतिक रूग्ण सुरक्षा दिन | १० | ११ सिकलसेल जनजागृती सप्ताह | १२ सार्वत्रिक आरोग्य उपलब्धता दिन | १३ | १४ |
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| २९ | ३० | ३१ | | | | |

**आरोग्य शिक्षणासाठी ब्लॉग व क़्युआर कोड स्कॅन करा : www. mahaarogyasamvad.in**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे
आपला दवाखाना
मोफत तपासणी | मोफत उपचार | मोफत औषधी



# 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'

नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांचा विस्तार, गरजूंसाठी घराजवळ उपचार सुविधा

या योजने अंतर्गत १०० हून अधिक वैद्यकीय चाचण्या करण्यात येणार आहेत

या दवाखान्याच्या माध्यमातून ३० सेवा, औषध आणि वैद्यकीय सल्ला देखील मोफत मिळणार आहे.



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

मोफत तपासणी | मोफत उपचार | मोफत औषधी

- राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या पुढाकाराने 9 फेब्रुवारी 2023 रोजी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेची घोषणा.
- राज्यातील लोकांना चांगली व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळावी, यासाठी 'मा. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेअंतर्गत प्रत्येक तालुक्यामध्ये एक याप्रमाणे संपूर्ण राज्यात आतापर्यंत 328 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरु करण्यात आले आहेत.
- महाराष्ट्र दिनानिमित्त 1 मे रोजी मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस तसेच आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत 317 आपला दवाखान्याचे डिजिटल अनावरण करण्यात आले.
- राज्यात 700 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरु करण्यात येणार आहेत.









# महाआरोग्य शिबिर





- ग्रामीण जनतेला महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी परंडा येथे जनतेच्या सहभागाने दि. 27 व 28 नोव्हेंबर 2023 रोजी महाआरोग्य शिबिर घेण्यात आले.
- या शिबिरात **2,48,855** पेक्षा जास्त लाभार्थ्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. या संदर्भित रुग्णांपैकी **6 नेत्र व 90 रुग्णांना श्रवण यंत्र वाटप** करण्यात आले. **172 दंत उपचार** व **89 रुग्णांवर दंत शस्त्रक्रिया** करण्यात आल्या. कर्करोग संशयित **17 रुग्णांची** तपासणी करून **3 रुग्णांची बायोप्सी** करण्यात आली.
- हृदयविकाराच्या 111 रुग्णांना संदर्भित करण्यात येऊन **17 रुग्णांवर एन्जिओग्राफी**, **5 रुग्णांवर एन्जोप्लास्टी**, **3 रुग्णांवर** एसडी शस्त्रक्रिया करण्यात आली.
- **40 महिला रुग्णांवर शस्त्रक्रिया** तसेच एमआरआय, हाडाची तपासणी, निदान व उपचार सेवा देण्यात आल्या.
- या शिबिरात शासकीय व खासगी डॉक्टरांचा तसेच आरोग्य सेवेतील तंत्रज्ञ कर्मचारी यांचा मोठा सहभाग.



रक्तदान अमूल्यदान

## "महारक्तदान" शिबीराचे आयोजन


- महारक्तदान शिबिराअंतर्गत दि. 9 फेब्रुवारी 2023 रोजी मा. मुख्यमंत्री श्री, एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात विविध जिल्ह्यांत स्वैच्छिक रक्तदान शिबीर घेण्यात आले.
- या शिबिरांत 538 रक्तकेंद्र सहभागी झाले.
- या रक्तदान महायज्ञात एकाच दिवशी राज्यात 10098 युनिट्स रक्त संकलित.
- राज्यात रक्त संक्रमण सेवेसाठी सद्यस्थितीत 366 रक्त केंद्र कार्यरत.





## विशेष महाआरोग्य शिबिर

- मा. मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात जिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र या संस्थांच्या ठिकाणी महाआरोग्य शिबिराचे आयोजन.
- प्राथमिक आरोग्य तपासण्या, मोफत रक्त चाचण्या, आभाकार्ड नोंदणी, आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा, कन्सल्टेशन तज्ज्ञ व आयुर्वेद सेवा देण्यात आल्या.
- राज्यभरात 3005 महाआरोग्य शिबिरांचे आयोजन.
- एकाच दिवसात 3 लाख 70 हजार 911 रुग्णांची तपासणी.



## मानसिक स्वास्थ्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे कार्यान्वित

मानसिक स्वास्थ्य आणि व्यसनाधिनतेची वाढती समस्या लक्षात घेता जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे नवीन व्यसनमुक्ती केंद्र कार्यान्वित करण्याची कार्यवाही करण्यात येत असून त्यांच्या बांधकामासाठीचे अनुदान जिल्ह्यांना वितरित करण्यात आलेले आहे. तसेच ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे NIMHANS बेंगलुरुच्या धर्तीवर पुनर्निर्माण करण्याची व कोल्हापूर येथे 365 खाटांचे नवीन मनोरुग्णालय उभारण्याची प्रक्रियादेखील सुरु झालेली आहे. यासाठी 850 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.




## "एक व्यक्ती एक पद" या योजनेची अंमलबजावणी

राज्यात आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी 'एक व्यक्ती एक पद' योजना राबविण्यात आली आहे. ज्या व्यक्तींकडे अनेक पदांची जबाबदारी होती, ती विभागून अनेक व्यक्तींना संधी देण्यात आली. एका व्यक्तीकडे एका पदाचे कार्य सोपविण्यात आले आहे. त्यामुळे कार्याला गती प्राप्त होत आहे.

# राज्यातील शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे बदल्या

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत यंदा प्रथमच ऑनलाईन पध्दतीने अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचा लाभ बहुतांश अधिकाऱ्यांना मिळालेला असून त्यांना त्यांच्या अपेक्षित ठिकाणी बदलीने पदस्थापना मिळालेली आहे. या प्रक्रियेमुळे बदली प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता व अचूकता आलेली आहे.





# शासकीय जिल्हा रुग्णालये व विविध आरोग्य संस्थांची बांधकामे

जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे येथील 900 खाटांच्या नवीन इमारतीचे व जिल्हा सामान्य रुग्णालय, पालघर येथील 200 खाटांच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील निधीमधून विविध आरोग्य संस्थाच्या बांधकामाची 171 कामे मंजूर करण्यात आलेली असून सदर कामेदेखील लवकरच हाती घेण्यात येणार आहेत.

# लिथोट्रीप्सी उपचार

राज्यातील रुग्णांना किडनी स्टोन या आजारावर अत्याधुनिक उपचार मिळावेत यासाठी 200 खाटांच्या सर्व रुग्णालयांमध्ये येत्या तीन वर्षात ही उपचार सेवा सुरु करण्यात येणार आहे. या वर्षी सहा जिल्ह्यात या सेवा उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.






# कर्करोगावरील किमोथेरपी - डे केअर सेंटर

महाराष्ट्रमध्ये अंदाजे 1.2 लाख व्यक्ती कर्करोग बाधित आहेत. रोगावरील उपचार महाग असल्यामुळे गरीब, ग्रामीण भागातील रुग्ण उपचार घेत नाहीत किंवा अर्धवट सोडतात. त्यामुळे 34 जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य रुग्णालय स्तरावर ही केंद्रे सुरु करण्यात येत आहेत.

# महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना



- राज्यात औषधी व रुग्णालय साधनसामग्री खरेदीसाठी महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण-2023 ची स्थापना.
- मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली हे मंडळ कार्य करणार.
- यामुळे औषधांची उपलब्धता वेळेवर होणे, गुणवत्ता, दर्जेदार औषधी कमी भावात उपलब्ध होण्यासाठी राज्याला मदत होणार आहे.



## हृदयरोग रुग्णांसाठी कार्डियाक कॅथलॅब

हृदयरोग हे मृत्यूचे महतत्त्वाचे कारण असून 12 जिल्ह्यांमध्ये स्टेमी प्रकल्प राबविण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने 15 कॅथलॅबची स्थापना करून जनतेला स्वस्त दरात सेवा उपलब्ध करून देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे.

## देशात महाराष्ट्र आरोग्य सेवेत अग्रेसर

देशात महाराष्ट्र आरोग्य सेवेत अग्रेसर असून राज्याला राष्ट्रीय स्तरावरून माता मृत्यू कमी करण्यासाठी द्वितीय पुरस्कार, लक्ष्य संस्था प्रमाणिकीकरणासाठी द्वितीय पुरस्कार, उत्कृष्ट काम केलेल्या आशा परिचरिका यांना द्वितीय पुरस्कार व किशोरवयीन शाळाबाह्य मुलींचे रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रथम पुरस्कार असे विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## कॅन्सर व्हॅन

आरोग्य विभागामार्फत नियमितपणे सर्वेक्षणाद्वारे संशयित कर्करुग्ण शोधले जातात. अशा रुग्णांसाठी बायोप्सी करणे आवश्यक असते. यासाठी आठ फिरत्या कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.




## 'मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र अभियान'

मोतिबिंदू हे अंधत्वाचे प्रमुख कारण आहे व शस्त्रक्रिया हा त्यावर एकमेव उपाय आहे. मोतिबिंदू तज्ज्ञांचा अनुशेष पूर्णपणे भरुन काढण्यासाठी तीन वर्षांत 27 लक्ष मोतिबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 87 शासकीय व 81 अशासकीय स्वयंसेवी संस्थामध्ये विशेषज्ञ सेवेसह शस्त्रक्रियागृह उपलब्ध आहेत. यांच्या माध्यमातून मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियान राबविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात येत आहे.

# धाराशिवला 'फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय'



- मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यात आरोग्य मंत्री मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या प्रयत्नातून फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय सुरू करण्यात आले.
- नीती आयोगाच्या प्रकल्पातून हे नावीन्यपूर्ण फिरते रुग्णालय जनतेच्या आरोग्य सेवेसाठी तयार करण्यात आले आहे.
- फिरत्या मल्टीस्पेशालिस्ट रुग्णालयामुळे आरोग्याचा हा रथ धाराशिव जिल्ह्यातील जनतेसाठी वरदान.
- या रुग्णालयात वातानुकूलित व्यवस्था, छोट्या शस्त्रक्रिया, अत्याधुनिक तपासण्यासाठी रुग्णांना खाटा उपलब्ध.

## सुंदर माझा दवाखाना

- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. ना. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून आरोग्य सेवा अधिक सुंदर, स्वच्छ व लोकाभिमुख करण्यासाठी दि. 7 ते 14 एप्रिल दरम्यान राज्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये "सुंदर माझा दवाखाना' हा उपक्रम राज्यभर राबविण्यात आला.
- या उपक्रमांतर्गत आरोग्य संस्था व भोवतालचा परिसर, सर्व विभाग, स्वच्छतागृहे, भांडारगृहे इत्यादींची स्वच्छता करण्यात आली, तसेच आरोग्य संस्थांच्या आवारात व दर्शनी भागात सुशोभीकरण, रंगरंगोटी आणि जनतेला देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांचे फलक लावण्यात आले.





## मिशन मेळघाट



- मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू तसेच माता मृत्यू कमी करण्याबाबत उपाययोजना.
- मेळघाटातील आरोग्य केंद्रातील रिक्त कर्मचाऱ्यांची पदे त्वरित भरण्याची कार्यवाही.
- 16 अतिरिक्त रुग्ण वाहिका तसेच 2 नवजात रुग्णवाहिका नव्याने कार्यरत.
- दोन वैद्यकीय फिरती पथके कार्यान्वित करण्यात आली
- सीटी स्कॅन मशीन कार्यान्वित करण्यात आले.
- 43 कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी
- स्वतःच्या खर्चातून मेळघाट येथील रुग्णालयांमध्ये स्वच्छ पाणी पिण्याकरिता अत्याधुनिक आर ओ फिल्टर बसविले.

# फिल्म फेस्टिव्हल 2023




सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने महाआरोग्य फिल्म फेस्टिवल 2022-23 चे आयोजन आणि पारितोषिक वितरण समारंभ बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. विजेत्यांना आरोग्य मंत्री मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते पारितोषिक, स्मृतिचिन्ह तसेच रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. श्री. धीरज कुमार, आयुक्त, आरोग्य सेवा, डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक, आरोग्य सेवा, पुणे, ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यावेळी उपस्थित होते

# ॥ आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी ॥

## पालखी मार्ग आणि पंढरपूर महाआरोग्य शिबिरांमध्ये एकूण

## ११,६४,६८४

## वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आली.





आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे जमलेल्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी आणि त्यांना ,मोफत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी दि. 27 ते 29 जून 2023 दरम्यान 3 दिवसीय महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. या प्रसंगी राज्याचे आरोग्य मंत्री मा. ना. प्रा. डॉ. तानाजी सावंत उपस्थित होते.


आरोग्यसेवेचा ११ लाख ६४ हजार वारकऱ्यांना लाभ

आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकृष्ण पवार : 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' व महाआरोग्य शिबिर यशस्वी



# निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे



एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री



अजितदादा पवार
मा. उपमुख्यमंत्री

## १८ वर्षांवरील सर्व पुरूषांची मोफत सर्वंकष आरोग्य तपासणी

निरोगी आरोग्य तरुणाईचे वैभव महाराष्ट्राचे



तानाजी सावंत
मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

## उपक्रम

आवश्यकतेनुसार रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया

मोठ्या शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्यास रुग्णांना महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंगीकृत रुग्णालयांमार्फत शस्त्रक्रिया

रुग्णांना विभागातील सर्व आरोग्य संस्थांमार्फत मोफत संदर्भ सेवा

ई-संजीवनी टेली कन्सल्टेशनच्या माध्यमातून रुग्णांना तज्ज्ञांच्या सेवा उपलब्ध

कालावधी- **१७ सप्टेंबर** ते **३१ डिसेंबर २०२३**

- **दि 22 डिसेंबर 2023 पर्यंत 2,05,42,161 पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी पूर्ण.**
- **चाचण्या करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या - 1,95,69,809**

### आरोग्य सेवा कुठे ?

- उपकेंद्र
- प्राथमिक आरोग्य केंद्र
- शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र
- शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र
- शहरी सामुदायिक आरोग्य केंद्र
- सर्व रुग्णालये
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
- ग्रामीण रुग्णालय
- उपजिल्हा रुग्णालय
- जिल्हा रुग्णालय
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

### उपचाराची सुविधा

- रक्तदाब
- मधुमेह
- हर्निया
- हायड्रोसील
- पोटाचे विकार
- एचआयव्ही
- तोंडाचा कर्करोग
- मनोविकार
- नेत्रतपासणी (मोतीबिंदू, काचबिंदू)
- पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेची सुविधा
- क्षयरोग (टीबी)

# राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम
## (राक्षदूका)

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत DBT (Direct Benefit transfer) मार्फत क्षयरुग्णांना पोषक आहारकरिता, प्रवासाकरिता क्षयरुग्णांचे औषध उपचार पूर्ण करणाऱ्या सहाय्यकास DBT मार्फत अनुदान देण्यात येते.

**1. निक्षय पोषण योजना**

प्रत्येक क्षयरुग्णाला (शासकीय व खासगी क्षेत्रातील दोन्ही) रु. 500/- मानधन पोषण आहाराकरिता प्रत्येक महिन्याला औषधोपचार पूर्ण होईपर्यंत द्यावे. जर रुग्णांचे बँक खाते उपलब्ध नसेल तर रुग्णाच्या लेखी संमतीने रुग्णाच्या नातेवाईकांच्या खात्यात मानधन जमा करता येईल.

**2. उपचार सहाय्यक**

क्षयरोगाचा उपचार दीर्घ कालावधीचा असल्यामुळे तो उपचार पूर्ण करून घेण्यास उपचार सहाय्यकची (Treatment Supporter) मदत होते. उपचार सहाय्यक हा/ ही आशा/ अंगणवाडी सेविका / प्रशिक्षित दाई/ स्वयंसेवक / खासगी वैद्यकीय व्यवसायिकांचे मदतनीस /खासगी केमिस्ट / रुग्णाचे कुटुंबातील व्यक्तीस (केंद्र/ राज्य शासनाचे कर्मचारी वगळून) इत्यादि असू शकतात.

- Drug Sensitive TB (उपचार काळ 6 महिने) रु. 1000 प्रति क्षयरुग्ण उपचार झाल्यानंतर मानधनपर देण्यात येते.
- Drug Resistant TB (उपचार काळ -12 ते 18 महिने) रु. 2000 प्रति क्षयरुग्ण IP phase पूर्ण झाल्यानंतर व रु. 3000 CP phase पूर्ण झाल्यानंतर मानधनपर देण्यात येते.

**3. आदिवासी प्रवास खर्च**

आदिवासी क्षयरुग्णांना जिल्हा क्षयरोग केंद्र/ कल्चर व डिएसटी/ एलपीए / CBNAAT (Diagnosis/ Follow up) तपासणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रु. 750 अनुदान प्रती क्षयरुग्ण अनुज्ञेय आहे. क्षयरुग्ण नोटिफाय झाल्याबरोबर सदर अनुदान क्षयरुग्णांच्या खात्यात जमा करण्यात येते.

**4. खासगी व्यावसायिक मानधन**

निदान झालेल्या रुग्णांची माहिती कार्यक्रमास कळविल्यास खासगी डॉक्टरांना रुपये 500/- व त्या रुग्णांचा उपचार यशस्वीरित्या पूर्ण केल्यास उपचारा अंती रुपये 500/- असे एकूण 1000/- रुपये अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येतात.

**5. एमडीआर, एक्सडीआर क्षयरुग्ण प्रवास खर्च**

एमडीआर, एक्सडीआर क्षयरुग्णांना जिल्हा क्षयरोग केंद्र / कल्चर व डिएसटी/ एलपीए/ CBNAAT (Diagnosis/ Follow up) तपासणीसाठीचा संपूर्ण सार्वजनिक वाहनाचा प्रवासाचा प्रत्यक्ष खर्च/ सोसायटीने ठरविलेल्या दराने देणे अपेक्षित आहे. एमडीआर/ एक्सडीआर क्षयरुग्ण व 1 सहाय्यकास, जिल्हा किंवा नोडल डीआर टीबी केंद्रापर्यंत उपचार/फॉलो अप किंवा उपचारा संबंधी करावा लागणारा सार्वजनिक वाहनाचा संपूर्ण प्रत्यक्ष खर्च किंवा जिल्हा/शहर क्षयरोग सोसायटीने ठरविलेला खर्च अनुज्ञेय आहे.

## ऋतुजन्य ताप

तुम्ही स्वतःला आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांना हंगामी तापापासून वाचवू शकता

**खालील लक्षणे आढळल्यास सावध रहा**

- ताप आणि खोकला, घसा खवखवणे, वाहणारे नाक, श्वास घेण्यास त्रास होणे. याशिवाय इतर लक्षणांमध्ये जसे की, अंगदुखी, डोकेदुखी, थकवा, थंडी वाजणे, जुलाब, उलट्या, विष्ठेतून रक्त येणे इ.

**काही महत्त्वाच्या गोष्टी जाणून घ्या**

- मौसमी ताप हवेत असलेल्या संक्रमित कणांद्वारे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरतो.
- 65 वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या लोकांसाठी, 5 वर्षांपेक्षा लहान मुले, कोणताही जुनाट आजार असलेले लोक आणि गर्भवती महिला आदींसाठी हा गंभीर आजार असू शकतो.
- सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये आवश्यक औषधे उपलब्ध आहेत.
- डॉक्टरांनी सल्ला दिल्यास घरीच रहा.
- जर लक्षणे वाढली तर, जवळच्या आरोग्य केंद्राला कळवा (जास्त ताप, श्वास घेण्यास त्रास, त्वचा किंवा ओठ निळसर रंगाचे होणे, थुंकीत रक्त किंवा वर्तणुकीत बदल). जर लहान मुलांना ताप, चिडचिडेपणा, किंवा द्रव आणि अन्न नाकारल्यास, त्यांना ताबडतोब रुग्णालयात घेऊन जा.



# जनाआजीचा सल्ला

बाबुराव शिरसाट

बायांनो ! मी जनाआजी बोलतेय. गेली तीस वर्षं या गावात बाळतपणं करतेय. अनेक आडलेल्या बायांची सोडवणूक केली. आता वय झालंय. साठी गाठलीय. अजूनही जमेल तेवढी सेवा चालू आहे.

तुम्ही म्हणणार ही म्हातारी कसलं शहाणपण शिकवतीय. बायांनो ! बाळंतपण करताना माझ्याही चुका झाल्या असतील, पण आता यापुढं तशा चुका होणार नाहीत. माझं आता सरकारी दवाखान्यातलं शिक्षण-दाई प्रशिक्षण-झालंय.

खरंच ते शिक्षण खूप चांगलं होतं. तिथल्या डॉक्टरनी मला खूप माहिती दिली. ते सगळं मी आज तुम्हाला सांगणार आहे. समस्त आयांच्या आणि पोरांच्या फायद्याचं आहे ते !

डॉक्टरांनी बाळाला अंगावर पाजल्यामुळं होणारे फायदे सांगितले. मी तेच तुम्हाला सांगणार आहे. बाळ जन्मल्यावर एक महिन्याच्या आत त्याला अंगावरच पाजायचं. पहिलं दूध फेकून देऊ नका. पहिलं दूध म्हणजे बाळाचं टॉनिक असतं, ते बाळाला पाजल्यामुळे त्याला कसलाही आजार होणार नाही. आईचं दूध म्हणजे संपूर्ण अन्न आहे. बाळाला मोठं व्हायसाठी लागणारं सगळं त्यामधी असतं. कोणत्याही वेळेला आणि पाहिजे तेवढं त्याला पाजवता येतं. आणि ते त्याला पचत असतं.

अहो, आईचं दूध पचायलाही सोपं असतं. देवानंच ती पोरांची सोय केलेली आहे. त्याचा कसलाही त्रास मुलाला होत नाही. आईच्या दुधात कसलेही जंतू नसतात. त्याला तापवायची गरज नसते. ते गरमच असतंय.

अंगावरच्या दुधाचे जसे बाळाला फायदे आहेत तसे आईलाही फायदे आहेत. बाळ अंगावर पीत असलं तर बाईचा पाळणाही लांबतो. बाईचं शरीर पहिल्या- 'सारखं होऊन राहतं.

बाळंतपणानं तर अंगावर (रक्तस्त्राव) जायचं कमी होतं.

शिकलेल्या बायांनो, पोराना बाटलीनं दूध पाजूनका. चोखणंही देऊ नका. अंगावरच पाजा. त्यानं बाळाला भावनिक आधार मिळतो. बाळाला ऊब मिळते. अंगावर दूध यावं म्हणून बाळाला थोड्या थोड्या वेळानं पाजावं. मूल अंगावर पीत असताना आईनं भरपूर आहार घेतला पाहिजे. हिरव्या पालेभाज्या, फळे खावीत. बाळाचं आणि आईचं दोघांचं पोषण व्हायचं असतं. बाळ निरोगी रहायचं असेल तर आईनं निरोगी राहिलं पाहिजे. पहिल्या सहा महिन्यापर्यंत बाळाला अंगावरच पाजावं. दुसरं काहीही त्याला प्यायला देऊ नका. मात्र सहा महिन्यानंतर बाळाला दुधाबरोबर वरचा आहार द्या. म्हणजे वरणाचं पाणी, फळांचा रस, भाज्यांचे सूप द्या.

बाळाचं वय वाढेल तशी त्याची भूकही वाढते.' त्यासाठी बाळाला पौष्टिक द्रवपदार्थ द्या. उकडलेला बटाटा, मऊ खिचडी द्या. घट्ट पदार्थही द्यायला हरकत नाही. एक वर्षापर्यंत सर्व अन्न बाळाला द्यायला हरकत नाही. एक सांगते बायानो ! बाळाला लस द्यायला विसरू नका. लस म्हणजे बाळाची कवचकुंडलं आहेत. वेळच्यावेळी रोगप्रतिबंधक लसी दिल्यानं बाळ आजारी पडत नाही. सहा लसी वेळवर द्या. बाळ बघा टुणटुणीत राहील.

बायांनो, मी आज जरा जास्तीच बडबडले. पण तुमच्या हिताचंच बोलले. बाळ किंवा तुम्ही आजारी पडला तर दवाखान्यात जावा. देवरशावर विश्वास ठेवू नका. डॉक्टरांचा सल्ला घ्या.

शेवटी डॉक्टरांनी आम्हांला जनाचा श्लोक सांगितला तो ऐका -

"अपत्यास स्तनपान दे नियमित  
चिकातून त्याला मिळे सत्व खूप सखे  
जोवरी दूध अंगावरी गे सुखे  
तोवरी रोज पाजीव तान्हे."

# डायबेटीस आणि पावलांची काळजी

डॉ. नितीन उनकुले

खालील कारणांमुळे डायबेटीस, पावलांच्या समस्यांना कारणीभूत ठरू शकतो.

1) संवेदना कमी झाल्याने दुखापत होण्याचा धोका अधिक.

2) रक्ताभिसरण नीट होत नसल्याने जखमा उशीरा भरून येतात.

3) जंतुसंसर्ग होऊन तो ध्यानात न आल्याने गँगरीन होण्याची शक्यता अधिक.

डायबेटीसवर चांगले नियंत्रण आणि पावलांची निगा राखण्याच्या चांगल्या पद्धती यामुळे अनेक नित्याच्या समस्या टाळता येतात.

**तुम्ही पावलांच्या मोठ्या समस्या टाळू शकाल, जर तुम्ही :**

1) पावलांच्या समस्यांची चिन्हे लवकर ओळखायला शिकलात.

2) तुमची पावले रोज तपासलीत.

3) तुमची पावले स्वच्छ आणि कोरडी ठेवलीत.

4) तुमच्या पायांच्या बोटांची नखे काळजीपूर्वक कापलीत.

5) योग्य पादत्राणे वापरून तुमच्या पावलांचे संरक्षण केलेत.

6) तुमच्या डॉक्टरकडून किंवा नर्सकडून तुमची पावले नियमितपणे तपासून घेतलीत, तर.

(विशेषतः तुमच्या पावलांमधील किंवा पायाच्या बोटांमधील संवेदना कमी झालेली असल्यास किंवा तुमची दृष्टी मंदावली असल्यास)

**पावलांची काळजी, काय करावे व काय करू नये :**

**हे करा :**

1) दररोज तुमची पावले कोमट पाण्याने धुवा.

2) पाण्याच्या तापमानाचा अंदाज तुमच्या कोपऱ्याने घ्या.

3) तुमची पावले नीट कोरडी करा. विशेषतः बोटांमधील जागेत.

4) रोज पावले तपासून, जखमा, फोड, खरचटलेले, लाली, शुष्कपणा, त्वचेत भेग नाहीत ना याची खात्री करा. तुम्हाला वाकता येत नसेल, तर आरशाचा वापर करा किंवा पावले वर उचलून घ्या किंवा दुसऱ्या कोणाला तरी तपासण्यास सांगा.

5) तुमची त्वचा शुष्क असेल, तर तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्याने लोशन लावा.

6) पायाच्या बोटांच्या बेचक्यात लोशन लावू नका. तुमच्या पावलांना खूप घाम येत असेल, तर टाल्कम पावडर लावा.

7) भोवऱ्या आणि घट्टे हळुवारपणे प्यूमिस स्टोनने घासा.

8) पायाच्या बोटांची नखे काळजीपूर्वक कापा.

9) नखे सरळ आडवी कापा.

10) कोपऱ्यांशी कापू नका. चुकून त्वचा कापली जाण्याची शक्यता आहे.

11) धारदार कडा कानशीने घासा.

12) नेहमी बूट किंवा स्लिपर्स वापरा.

13) पादत्राणे घालण्यापूर्वी त्यांच्या आतील भाग हाताने चाचपून तपासून पहा.

14) नीट बसणारे मऊ बूट आणि स्वच्छ मोजे वापरा.

15) मोज्यांना पडलेल्या सुरकुत्या नीट घालवून स्वच्छ मोजे घाला.

16) दर वेळी तुमचे बूट काढल्यावर तुमची पावले तपासा.

**हे करू नका :**

1) तुमच्या पावलांवर गरम पाण्याच्या बाटल्या किंवा हीटिंग पॅडस ठेवू नका.

2) भोवऱ्या किंवा घट्टे कधीही कापू नका तसेच कॉर्न पॅडस किंवा कॉर्न मेडिकेशन वापरू नका.

3) लहानात लहान शस्त्रक्रिया सुद्धा स्वतःच स्वतःवर करू नका.

4) घट्ट बसणारे किंवा झिजलेले बूट किंवा मोजे वापरू नका.

5) कधीही अनवाणी चालू नका. विशेषतः बीचवरील वाळू इ.वर

**पावलांच्या दुखापतीसाठी प्रथमोपचार :**

1) तुमच्या पावलाला दुखापत झाल्यास तुम्हाला वेदना होतीलच असे नाही, पण तरीही दुखापतींकडे दुर्लक्ष करू नये. पावलांच्या दुखापतीसाठी हा साधा प्रथमोपचार करावा.

2) दुखापतीची जागा सौम्य साबण वापरून धुवावी व कोरडी करून सौम्य अँटिसेप्टिक लावावे.

3) आयोडीन, इप्सम सॉल्ट्स किंवा बोरिक ॲसिड वापरू नये.
4) बँडेजची गरज असल्यास स्मॉल पॅड आणि नॉन- ॲलर्जिक टेप वापरावी.
5) दुखापत झालेल्या पायाला एकावेळी 20 मिनिटे या प्रमाणे अनेकदा विश्रांती द्यावी.

**पावलांच्या निगेसाठी सामग्री :**
1) घट्ट्यांसाठी एमरी बोर्डस बफ् किट्स
2) शुष्क त्वचेसाठी लॅनोलिनवर आधारित लोशन
3) फूट पावडर
4) नॉन ॲलर्जिक टेप्स आणि स्मॉल गेज पॅड्स

**ध्यानात ठेवा :**
1) पावलांच्या समस्यांना प्रतिबंध करता येतो आणि निवारण्याच्या खटाटोपापेक्षा प्रतिबंध श्रेयस्कर आहे.
2) दरवर्षी नियमित तपासण्या करून घ्या.
3) तुमच्या रक्तातील साखर नियंत्रणात ठेवा.
4) धुम्रपान थांबवा!

भरून न येणाऱ्या जखमा, टोचल्याच्या जखमा, कापलेल्या जागी पू होणे, लाल चट्टे, आत वळून वाढणारी पायाच्या बोटांची नखे, काढण्यास कठीण अशा भोवऱ्या किंवा घट्टे यासाठी डॉक्टरांची मदत घ्या.

तुम्हाला आणखी स्पष्टीकरण हवे असल्यास आपल्या डॉक्टरांशी अवश्य संपर्क साधा.

दररोज पावलांची चांगली काळजी घेतल्याने ॲप्युटेशनची पाळी येणार नाही

**( 'मधुमेहासाठी मधूरयोग' पुस्तकातून साभार )**

# जाहीर आवाहन

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाच्या वतीने दरमहा महाराष्ट्र आरोग्य पत्रिका छपाई करून वितरण केल्या जात होत्या तथापि वर्गणीदाराचे अपुर्ण पत्ते पिनकोड मुळे वर्गणीदारांना आरोग्य पत्रिका विहित वेळेत प्राप्त होत नव्हत्या किंवा मिळत नव्हत्या त्यामुळे वर्गणीदारांची आरोग्य पत्रिका न मिळाल्या बाबत विचारणा होत असते. तसेच ईकोफ्रेंडली पत्रिका, वेळेचे नियोजन या सर्व बाबींचा विचार करून आरोग्य पत्रिका ई-अंक स्वरूपात प्रसिद्ध करणे बाबत मा. आयुक्त यांची मान्यता मिळाली आहे.

तरी आपणांस जाहीरपणे कळविण्यात येते की, दिनांक 1 जानेवारी 2024 पासून आरोग्य पत्रिके साठी रु.50/- प्रमाणे घेण्यात येणारी वार्षिक वर्गणी बंद करण्यात येत असून सदरची आरोग्य पत्रिका ई-अंक स्वरूपात मोफत उपलब्ध करून देण्यात येईल. यासाठी खालील महाआरोग्य आयईसी ब्युरोच्या समाज माध्यमांद्वारे आरोग्य पत्रिका ई-अंक स्वरूपात उपलब्ध असतील.

**सदरची माध्यमे खालीलप्रमाणे :**
1. Maha Arogya sanwad - लिंक - https://mahaarogyasamvadiec.in
2 Facebook - Maha Arogya IEC Bureau - लिंक - https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau
3. Instagram – magahealthiec - लिंक - https://www.instagram.com/mahahealthiec/
4. Twitter - @MahaHealthIEC - लिंक - https://twitter.com/MahaHealthIEC
5. You-Tube - Maha Health IEC
लिंक - https://www.youtube.com/channel/UC4JxQBhtS6ePB8jkzHdqRmw/?sub_confirmation=1

वेळ :- १ तास एकूण गुण :- ३५

प्रश्न क्रं. १. योग्य पर्याय निवडा (एकुण गुण -१०)

अ) आशाला कार्य करताना कोणती मुल्ये मार्गदर्शन करतील

१) प्रत्येक व्यक्तीशी सारखेच वर्तन करणे. २) लोकांच्या परंपरा आणि विचार यांचा आदर करणे.
३) आदर्श व्यक्ती बनणे ४) वरील सर्व घटक

ब) वजनाने कमी असलेल्या शिशु सुरुवातीला स्तनपान करु शकत नाही. अशा परिस्थितीत त्याला मातेचे दुध देण्यासाठी आपण काय उपाय कराल.

१) चमच्याचा वापर करावा २) बाटलीचा वापर करावा. ३) स्तनासारख्या निपलचा वापर
४) वरिलपैकी सर्व

क) खालील कोणती उपाययोजना केली तर जुलाब प्रतिबंध करण्यास मदत होईल.

१) अन्न सुरक्षितपणे हाताळणे २) योग्य पध्दतीने ओला व घन कचऱ्याची विल्हेवाट लावणे ३) हात धुणे
४) वरील सर्व

ड) लैंगिक हिंसाचाराच्या बाबतीत आशाने खालीलपैकी कोणती गोष्ट करु नये.
अ) महिलेला तात्काळ सुरक्षित जागेवर पाठवावे. ब) कुटुंबाच्या सदस्याशी संपर्क साधणे क) दुसऱ्यांना महिलेच्या स्थितीबाबत सांगणे. ड) महिलांना कायदेशीर कारवाईच्या बाबतीत सांगणे.
इ) एचआयव्ही पासून बचावासाठी खालीलपैकी कोणती बाब उपयोगी पडत नाही.
१) लैंगिक संबंधांच्या वेळी कंडोमचा वापर करणे २) एक पेक्षा जास्त व्यक्तींबरोबर लैंगिक संबंध टाळणे.
३) डास चावल्यापासून बचाव करणे. ४) रक्त घेताना ते सुरक्षित आहे याची खात्री करणे.

प्रश्न क्रं. २ योग्य जोडया जुळवा. (एकुण गुण - ५)

| | | | |
|---|---|---|---|
| अ) २ वर्षाचा मुलगा वजन १० किलो | (५) | १) | ग्रामीण आरोग्य स्वच्छता व पोषण समिती |
| ब) बाळ १२ आठवडयाचे श्वास ५५/मि. | (४) | २) | आहारात वापर कमी |
| क) सी.बी.ए.सी फॉर्म | (२) | ३) | आशांसाठी सर्व्हेक्षण फॉर्म |
| ड) तेल व स्निग्ध पदार्थ | (३) | ४) | असाधारण |
| इ) व्हीएचएनएससी | (१) | ५) | मध्यम कुपोषित |

प्रश्न क्रं. ३ चुक बरोबर पर्याय निवडा (एकुण गुण -५)
१) गर्भावस्थेत दरम्यान गर्भवती महिलेने पपई, काकडी, व इतर फळे खाऊ नयेत चुक/बरोबर
२) नाळ बाहेर येण्यापूर्वीच नवीन जन्मलेल्या शिशुला आईच्या छातीवर ठेवणे. चुक/बरोबर
३) भारतामध्ये ५० टक्के बालकांचा मत्यू कुपोषणामुळे होतो. चुक/बरोबर
४) जनस्वास्थ सुविधा आणि सेवा कुठल्याही भेदभावाशिवाय सर्वांना उपलब्ध झाल्या पाहिजेत. चुक/बरोबर
५) तोंडाचा कॅन्सर आहे हे समजण्यासाठी आशांमार्फत तिने केली जाणारी प्राथमिक तपासणी तोंड उघडणे किंवा मोठा आ होत आहे का हे बघणे ही होय चुक/बरोबर

प्रश्न क्रं. ४ एका वाक्यात उत्तरे दया (एकुण गुण - ५)

१) एखादया गर्भवती महिलेची संध्याकाळनंतर अंधुक दिसत असेल तर तिला काय झाले असावे ?
उत्तर - रातांधळेपणा
२. मुलांचे पोषण व वाढ या संदर्भात खेडयातील कोणत्या सेवकाने लक्ष देणे अपेक्षित आहे ?
उत्तर - अंगणवाडी सेविका व एकात्मिक बाल विकास केंद्र सेवक.
३. कोणत्या तीन परिस्थितीत स्त्रिया गर्भपात करु शकतात?
उत्तर - १) गर्भनिरोधक उपचार असफल होणे, २) गर्भावस्थेमुळे तिच्या जीवाला धोका निर्माण झाल्यास, ३) बलात्कार झाल्यामुळे होणारी गर्भधारणा ४) नवजात बालकामध्ये काही जन्मजात दोष निर्माण होण्याचा धोका निर्माण होणे.
४. क्षयरोगी रोगापासून पूर्णपणे मुक्त कधी म्हटला जातो?
उत्तर - रोग्याची थुंकिची तपासणी केल्यानंतर उपचार चालू करुन पूर्ण केले असतील व नंतरच्या दोन्ही वेळच्या तपासणीचे निष्कर्ष नकारात्मक आले असतील त्या रोग्याला रोगमुक्त घोषित केले जाते.
५. HBYC अंतर्गत येणाऱ्या आशांसाठी गृहभेटी किती व कोणत्या ?
उत्तर - HBYC अंतर्गत येणाऱ्या आशांसाठी गृहभेटी ५ आहेत. आशाने ३ महिने, ६ महिने, ९ महिने, १२ महिने आणि १५ महिने बालकाला भेट दिली पाहिजे.

प्रश्न क्रं. ५ केस स्टडी. / उतारा वाचून उत्तरे दया (एकुण गुण -५)

गणेशला चार वर्षापूर्वी एच.आय.व्ही. ची लागण झाली होती. त्याचे लग्न तीन वर्षापूर्वी झाले. पण त्याने त्याच्या एच.आय.व्ही. बद्दल आपल्या पत्नीला सांगितले नाही. त्यांना दीड वर्षाची मुलगी आहे. नुकतेच त्याने आपल्या पत्नीला त्याला एच.आय.व्ही. ची लागण झाल्याचे सांगितले.

१) गणेशला कशाची लागण झाली होती?
उत्तर :- गणेशला एच.आय.व्ही. ची लागण झाली होती.
२) तुम्ही गणेशच्या पत्नीला काय करण्याचा सल्ला दयाल?
उत्तर :- तिला व तिच्या मुलीला आरोग्य केंद्रात जावून एच.आय.व्ही. चाचणी करुन घेण्यास प्रोत्साहित करा.
३) जर गणेशच्या पत्नीची एच.आय.व्ही. टेस्ट नकारात्मक आली तर तुम्ही तिला एच.आय.व्ही. ची लागण होऊ नये म्हणून कोणती काळजी घेण्यास सांगाल?
उत्तर :- तिला व तिच्या पतीला संभोग करण्याच्या प्रत्येक वेळी कंडोम वापरण्यास प्रोत्साहित करा.

प्रश्न क्रं. ६ प्रात्यक्षिक (एकुण गुण -५)

नवजात बाळाला गुंडाळणे

१) खोली उबदार ठेवा (प्रौढांसाठी पुरेसे उबदार)
२) खोलीतील सर्व खिडक्या बंद करा.
३) बाळाला गुंडाळण्यापूर्वी खात्री करा की बाळ ओले नाही.
४) अंगात कमीत कमी कपडे व डोक्यावर टोपी आहे.
५) स्वच्छ ब्लॅकेट वरुन फोल्ड करा.
६) हळूवार बाळाला ब्लॅकेटवर ठेवणे.
७) बाळाचे डोके, कपाळ, कान ब्लॅकेटने झाकून ठेवा.
८) बाळाच्या पायाकडील भाग ब्लॅकेटने गुंडाळा.
९) एका बाजूकडून बाळाला गुंडाळा नंतर दुसरी बाजू गुंडाळा.
१०) बाळाला आईकडे परत दया व यापुढे तसेच गुंडाळून ठेवणेबाबत सल्ला दया.

# राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र महाराष्ट्र पुणे

## सर्व जिल्हानिहाय आशा स्वयंसेविका गुणानुक्रम तक्ता माहे डिसेंबर २०२३

| अ.क्रं | परिमंडळ | जिल्हा | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्राप्त गुण | मागील महिन्यात मिळालेला मोबदला (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ठाणे | ठाणे | मुरबाड | म्हसा | श्रीमती सुगंधा संतोष देशमुख, मो. नं. ७७६८८८४५९७ | ३४ | ११७०० |
| २ | | रायगड | कर्जत | काडव | श्रीमती पुष्पा वासुदेव करनूक, रा. चिंचवली | ३३ | ३१०० |
| ३ | | पालघर | निरंक | | | | |
| ४ | नाशिक | नाशिक | सुरगाणा | पांगारणे | श्रीमती रंजना चेतन कुवर, मु.पो. बर्डिपाडा | ३२ | ७२२५ |
| ५ | | धुळे | साक्री | कळंभीर | श्रीमती शितल तुषार निकम, मो. नं.७७४३८८८१२६ | २९ | ६२४० |
| ६ | | नंदुरबार | नंदुरबार | शनिमांडळ | श्रीमती वंदना कैलास पाटील मु.पो. शनिमांडळ, मो. नं. ८२०८१४४६२७ | ३४ | ६१३५ |
| ७ | | जळगाव | यावल | किनगाव | श्रीमती दुर्गा सुरेश तायडे, मो.नं. ९८८१८९९५०४ | ३५ | ४८६५ |
| | | अहमदनगर | श्रीगोंदा | लोणी व्यंकनाथ | श्रीमती भाग्यश्री दिपक राऊत, मु. पो. लोणी व्यंकनाथ | ३५ | १३४३५ |
| ९ | पुणे | पुणे | खेड | शेलपिंपळगाव | श्रीमती उषा रामदास पारधी | ३५ | ११५०० |
| १० | | सातारा | सातारा | चिंचनेर वंदण | श्रीमती शुभांगी विजय घाडगे, मु.पो. चिंचनेर वंदण | ३५ | ३५२५ |
| ११ | | सोलापूर | निरंक | | | | |
| १२ | कोल्हापूर | कोल्हापूर | चंदगड | कोवाड | श्रीम. कविता श्रीराम बाचूळकर, गाव कागणी, मो.नं.९१४६६३६५३७ | ३५ | ६२५० |
| १३ | | सांगली | तासगाव | चिंचणी | श्रीमती संगिता आनंद बेडगे, मो. नं. ९७६४९८८१४० | ३४ | ९१२२ |
| १४ | | सिंधुदुर्ग | अप्राप्त | | | | |
| १५ | | रत्नागिरी | दापोली | कोळवली | श्रीमती विजया विजय चव्हाण, रा कोळवली, मो.नं. ९०२८९६४१४६ | ३५ | १०५१० |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद | पैठण | पिपंळवाडी | श्रीमती रंजना सांरगधर गवळी, मु.पो.पिंपळवाडी ,ता.जि.औरंगाबाद. मो नं.-९३२२२५१०२६ | ३५ | ७१७५ |
| १७ | | जालना | अप्राप्त | | | | |
| १८ | | परभणी | सेलू | देऊळगाव गात | श्रीमती वर्षा भगवानराव बांदल, मु. नें. ७७४४०६०८७१ | ३२ | १०४०६ |
| १९ | | हिंगोली | औंढा ना. | लोहरा बु | श्रीमती सुषमा दत्तराव चिलगर, मु.पो.वडचुणा, मो.नं. ७६६६८१३५९२ | ३५ | ६८७५ |
| २० | लातुर | लातुर | रेणापूर | पानगाव | श्रीमती अन्वरबानू इस्माईल शेख रा.पानगाव ता.रेणापूर जि.लातूर ९६७३३८१३८६ | ३२ | ८४२५ |
| २१ | | उस्मानाबाद | कळंब | शिराढोण | श्रीमती अश्विनी महादेव गुरव , गाव - शिराढोण, उपकेंद्र पिंपरी शि. मो.क्र. ८३९००१६८७२ | ३५ | ९५७५ |
| २२ | | बीड | गेवराई | तलवाडा | श्रीमती सुरेखा बाजीराव शेळके गाव- चव्हाणवाडी, मु.पो.चव्हाणवाडी ता गेवराई जि.बीड.मों.नं. ९३०९८७५२५६ | ३५ | ११९७६ |
| | | नांदेड | माहुर | इवलेश्वर | श्रीमती जयश्री हिरामण वाघमारे, मु.पो. महाडापूर, मो.नं. ८९७५७३७४९५ | ३५ | - |
| २४ | अकोला | अकोला | अकोला | कान्हेरी | श्रीमती मिना विनय जंजाळ, मो. नं.९५०३९५८१४० | ३० | ६३५० |
| २५ | | वाशिम | मंगरुळपीर | कासोळा | श्रीमती ज्योती विजय उगवले | ३५ | ८५२० |
| २६ | | अमरावती | अप्राप्त | | | | |

| अ.क्रं | परिमंडळ | जिल्हा | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्राप्त गुण | मागील महिन्यात मिळालेला मोबदला (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | | यवतमाळ | महागाव | पोहांडुल | श्रीमती शितल खुशाल खंदारे, मु.पो. धनोडा, मो.नं. ९५१८९३३९३४ | ३३ | ४७५० |
| २८ | | बुलढाणा | सिंदखेड राजा | किनगाव राजा | श्रीमती सुनिता विठठल दुधारे, मु.पो. चांगेफळ, मो.नं.८३७९०२३२०५ | ३० | ४३०० |
| २९ | नागपूर | नागपुर | नागपुर ग्रा. | बोरखेडी | श्रीमती अनिता सहारे, डोंगरगाव | ३४ | ६६३० |
| ३० | | वर्धा | हिंगणघाट | कानगाव | श्रीमती अर्चना सुनिल पोहाणे, मु.पो. कानगाव, मो.नं. ९०२२७२३९०१ | ३५ | १२१४४ |
| ३१ | | भंडारा | भंडारा | खमारी | श्रीमती दुर्गा क्रिष्णा भुरे, मु.आबांडी पो.सिल्ली ता. जि.भंडारा, मो. नं. ९१४५४७४७३२ | ३५ | १५३५० |
| ३२ | | गोंदिया | अर्जुनी/मोर. | केशोरी | श्रीमती चंदना बंकीम साना मु. दिनकरनगर ९६७३८६३५७६ | ३५ | ९२४६ |
| ३३ | | चंद्रपूर | चंद्रपूर | दुर्गापर | श्रीमती जयमाला विठठल बारसागडे, सिनेमा झोपडपट्टी, मो.नं. ७४९९१३४५६९ | ३५ | ८५४५ |
| ३४ | | गडचिरोली | चामोर्शी | मार्कंडा (कं) | श्रीमती गिर्जा साईनाथ बोळकुंडवार, रा.ठाकरी, ता.चामोर्शी (९६८९६००३९६) | ३५ | ११५५० |

# ऋतुजन्य तापापासून बचाव कसा कराल?

संसर्ग प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी 'काय करावे' आणि 'काय करु नये' हे लक्षात ठेवा

## काय करावे


मास्क घाला आणि गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा


शिंकताना आणि खोकताना तोंड आणि नाक रुमालाने किंवा कपड्याने अवश्य झाकून घ्या


भरपूर द्रव पदार्थांचे सेवन करा


डोळे आणि नाकाला स्पर्श करणे टाळा


ताप आणि अंगदुखी असेल तर पॅरासिटामॉल घ्या

## काय करु नये


हस्तांदोलन किंवा अन्य प्रकारे संपर्क होईल असे अभिवादन करु नका


सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका


डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय प्रतिजैविक किंवा इतर औषधे घेऊ नका


इतरांसोबत बसून जेवण करु नका

## कविता

# गावकडून शहराकडे

निसर्गाच्या कुशीमधे, होते गाव सुंदरसे
स्वच्छ निर्मळ जीवन, मोकळे अन् संथ असे
मोजकीच उलाढाल, विश्व होते सानुलेसे
शिवा जिवा भिवा यांचे, नाते होते अतुटसे

शहरात नोकरी ती, शिवा गेला हरखून
जीवा आणि भिवा यांना, बोलावले मागाहून
ठेवताच पाय मात्र, अंग गेले शहारून
कचऱ्याचे ढीग आणि, दशा वस्तीची पाहून

वाहनांची गर्दी मोठी, मोठे रस्ते भरलेले
धूळ धूर भरपूर, अवकाश व्यापलेले
प्रत्येकाची घाई घाई, क्षण क्षण मोजलेले
कशा कशाचे व्यापार, नाही कोणा समजले

अर्थामागे धावतांना, आयुष्याचा अर्थ गेला
आगगाडी बसगाडी, अर्धा वेळ वाया गेला
सगळीच कृत्रिमता, निसर्गाशी हो अबोला
व्यसने नि प्रदूषणे, आरोग्याचा ह्रास झाला

संधी व्यवसायांसाठी, गावांमधे का नसावी ?
उपेक्षित नगरांची, पुनर्रचना करावी
बकाल त्या वस्त्यांमधे, उंच घरे का न व्हावी ?
परिसर स्वच्छतेची, जाण प्रत्येकाला हवी

कवयित्री - डॉ आशा प्रतिनिधि

# कविता

"मकरसंक्रांतीचा आरोग्यदायी पतंग"

आला आला मकर संक्रांतीचा सण
तीळगुळ खाण्याचा आनंददायी क्षण

लाट आहे थंडीची तिळगुळात चाहूल उष्णतेची
गुळ आहे गोड गोड,
तिळाची त्यास आहे चवीला जोड

आहारातील तिळगुळाने नुसता नव्हे गोडवा
पोषक घटकासह निरोगी आरोग्य जोडवा

तिळगूळात फायबर, आयर्न, कॅल्शियम
प्रथिने, झिंक यासह मिळते मॅग्नेशियम

कर्करोग,उच्च रक्तदाब राहील प्रतिबंधित
ऊर्जा मिळून बरी होईल सांधेदुखी निश्चित

हाडे होतील मजबूत, वाढ होईल चांगली केसांची
महिला, आई-बाळासह काळजी घेतली
जाईल सर्वांच्या त्वचेची

यकृत, हृदय, फुफ्फुस आणि डोळ्याचे
तीळगुळ सेवनाने निरोगी व
चांगले आरोग्य राहील सर्वांचे

होतील दूर सर्व विकार पोटाचे
थकवा जाऊन तेज वाढेल बुध्दीचे

थंडीच्या वातावरणात होईल शरीराचे रक्षण
भूक वाढून रोगप्रतिकारशक्ती बनेल सक्षम
करा नियमित सेवन तिळगुळाचे
निरोगी शरीर राहील कायमचे

मकर संक्रांतीच्या दिनी विसरा सर्व उणी धुनी
तिळगुळ घेऊन गोड बोलत
एकत्र रहा मनमिळोनी

विनंती करतो सर्वांना
मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर
उंच उंच पतंग उडवा स्वतःच्याच
चांगल्याआरोग्याचा आयुष्यभर

कवी - बापूराव गर्जे.





# परंडा येथे आरोग्य मंत्री तथा पालक मंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते 100 खाटांच्या उपजिल्हा व स्त्री रुग्णालयाचे भूमिपूजन

**परंडा** - राज्याचे आरोग्य मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालक मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते दि. 8 जानेवारी रोजी परंडा येथे 100 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय आणि 100 खाटांच्या स्त्री रुग्णालयाचे भूमिपूजन करण्यात आले. दोन्ही इमारतीच्या बांधकामावर 87 कोटी रुपये खर्च करून ह्या रुग्णालयांच्या इमारती तयार होणार आहे.

50 खाटांच्या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करण्यात आल्याचे सांगून डॉ. सावंत म्हणाले, आरोग्य सेवा बळकट करण्यात शासन कमी पडणार नाही. तसेच निधीची कमतरताही देखील पडू देणार नाही. येत्या एका वर्षात हे दोन्ही रुग्णालये जनतेच्या सेवेसाठी सज्ज होतील. या दोन्ही रुग्णालयांमध्ये सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या ठिकाणी रक्तपेढी, डायलासिस आणि इतर रोगांवर उपचार केले जातील. रुग्णालयात आलेल्या प्रत्येक रुग्णाला काळजीपूर्वक तपासून उपचार देणे बंधनकारक राहील. आवश्यकता नसल्यास इतर ठिकाणी रेफर करण्यावर आळा घालण्यासाठी उपाययोजना केल्या जाणार आहेत, असे डॉ. सावंत यांनी यावेळी सांगितले.


यावेळी विभागीय आरोग्य उपसंचालक डॉ.अर्चना भोसले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. इस्माईल मुल्ला, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, प्रमुख लोकप्रतिनिधी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाला परंडा तालुक्यातील आशाताई आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# लातूरच्या आठ आरोग्य केंद्रांना मिळाला सर्वोच्च मानांकनाचा बहुमान

- लातूर : राष्ट्रीय स्तरावर आणि शासनाच्या आरोग्य विभागात सर्वोच्च गणल्या जाणाऱ्या नॅशनल हेल्थ सिस्टिम रिसोर्स सेंटरचे जिल्ह्यातील आठ प्राथमिक आरोग्य केंद्रांना मानांकन मिळाले आहे. पारितोषिक म्हणून तीन वर्षांत या केंद्रांना एकूण 72 लाख रु. मिळणार आहेत. विशेष म्हणजे, राज्यात एकाच वेळी आठ केंद्रांना मानांकन मिळविण्याचा पहिलाच बहुमान लातूरने प्राप्त केला आहे. जि. प. आरोग्य विभागाने गुणवत्तापूर्ण सेवा सुविधा देत राज्याबरोबर देशस्तरावर आपला ठसा उमटविला आहे.
- केंद्रीय कुटुंब मंत्रालयाअंतर्गतच्या कल्याण एनकॉस मार्फत नोव्हेंबरमध्ये जिल्ह्यातील जवळा बु, वांजरवाडा, हडोळती, शिरूर ताजबंद, जवळगा पो., लामजना, कासार बालकुंदा, हंडरगुळी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे विविध राज्यांतील 10 तज्ज्ञांच्या पथकाकडून मूल्यांकन झाले होते. या पथकाने प्रत्येक केंद्रात एक हजारपेक्षा अधिक मुद्यांचे रेकॉर्ड तपासले. याशिवाय, कर्मचाऱ्यांच्या ज्ञानाच्या चाचण्या घेतल्या. बाह्यरुग्ण विभाग, प्रसूतीगृह, प्रयोगशाळा, राष्ट्रीय कार्यक्रम अंमलबजावणी, प्रशासन, आंतररुग्ण विभाग अशा सहा विभागांची पथकाने सखोल तपासणी केली. त्याचबरोबर आरोग्य केंद्रातून देण्यात येणाऱ्या सेवा, रुग्णांच्या प्रतिक्रियाही घेण्यात आल्या होत्या.



**प्रधानमंत्री उत्कृष्ट सेवा पुरस्कारही...**

- केंद्र शासनाच्या कायाकल्पमध्ये गेल्या वर्षी जिल्ह्यास 31 लाखांचे बक्षीस मिळाले.
- राज्यात सर्वाधिक पुरस्कार मिळविणारा लातूर जिल्हा ठरला.
- त्याचबरोबर गत एप्रिलमध्ये आरोग्यवर्धिनीतील गुणवत्तापूर्ण सेवेसाठी प्रशासनातील प्रधानमंत्री उत्कृष्ट सेवा पुरस्काराने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जिल्हा आरोग्य विभागास

**प्रत्येक केंद्रास वर्षाला तीन लाख...**

- जिल्हा आरोग्य विभागातील जवळपास 50 टक्के पदे रिक्त आहेत. त्यावर मात करीत हे मानांकन मिळविले आहे. त्यामुळे प्रत्येक आरोग्य केंद्रांना वार्षिक तीन लाख अशीं तीन वर्षें रक्कम मिळणार आहे.
- एकूण या केंद्रांना 72 लाख मिळणार आहेत. त्यातून आरोग्य सेवा सुधारण्यास मदत होणार आहे.

**मानांकनामुळे प्रोत्साहन...**

- आठ आरोग्य केंद्रांना एनकॉसचे मानांकन मिळाल्याने सेवा- सुविधा अधिक बळकट होतील. तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच मनोबल वाढण्यास मदत होणार आहे, अशी भावना डॉ. एच.व्ही. वडगावे, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी व्यक्त केली आहे.

# वाशी येथे उपजिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन

वाशी - येथील 50 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा भूमिपूजन सोहळा व 20 कोटी रुपये निधीच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालक मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

ग्रामीण भागात चांगली आरोग्य सुविधा मिळावी ही शासनाची मुख्य भूमिका आहे. त्यामुळेच आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी शासन कुठेही कमी पडणार नाही, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालक मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी यावेळी केले. तसेच येणाऱ्या एका वर्षाच्या आत सदर रुग्णालय जनतेच्या सेवेत दाखल होईल, अशीही ग्वाहीही दिली.

यावेळी विभागीय आरोग्य उपसंचालिका डॉ.अर्चना भोसले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. इस्माईल मुल्ला, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, ग्रामीण रुग्णालय अधिकारी दयानंद कवाडे, तसेच वाशी तालुक्यातील प्रमुख लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.










# लेखकांना विनंती

वाचकांचे मनोगत हे सदर लवकरच सुरु करीत आहोत,
तरी लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय ई-मेल आयडीवर अवश्य कळवावा.
**e-mail: arogyapatrikamh@gmail.com**

- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेत आरोग्यासंबंधीच्या विषयांवर लेख, कविता,यशकथा इत्यादी साहित्य प्रकाशित केले जाते.
- साहित्य अप्रकाशित असावे. लेख मुख्य संपादक तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.ब्युरो) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर पाठवावेत. साहित्य प्रकाशित झाल्यावर अंक लेखकाला भेट दिला जातो. लेखकांनी स्वतःचा पूर्ण पत्ता दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी लिहावा.
- केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा क्षेत्र अनुभवांवरील साहित्याला प्राधान्य देण्यात येते. फक्त मराठी भाषेतील मजकुर प्रसिद्ध होतो.
- लेख/साहित्य प्राप्त झाल्यावर निवड समितीच्या मान्यतेने साहित्याची निवड केली जाते. अस्वीकृत साहित्य परत पाठविणे शक्य होत नाही. आपले लेख कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करुन पाठवावेत. शब्द संख्या 700 ते 800 असावी.
- अपेक्षित महिन्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर संबंधित लेख या कार्यालयास प्राप्त झाल्यास छपाईचे योग्य काम योग्य वेळेत पूर्ण होऊ शकते. पुढील 3 महिन्यांसाठीचे विषय पुढे दिले आहेत.

## आरोग्य पत्रिकेसाठी पुढील महिन्यांसाठीचे विषय

### फेब्रुवारी २०२४

- **४ फेब्रुवारी** जागतिक कर्करोग दिन
- **५ फेब्रुवारी** मौखिक आरोग्य दिन
- **१० फेब्रुवारी** राष्ट्रीय जंतनाशक दिन
- **११ फेब्रुवारी** जागतिक रुग्ण दिन व जागतिक युनानी दिन
- **१२ फेब्रुवारी** प्रजनन आरोग्य जागरुकता दिन

### मार्च २०२४

- **८ मार्च** जागतिक महिला दिन व धूम्रपान विरोधी दिन
- **९ मार्च** जागतिक मूत्रपिंड दिन
- **१० मार्च** गर्भधारणेतील मधुमेह जागरूकता दिवस
- **१२ते१८ मार्च** जागतिक काचबिंदू सप्ताह
- **१६ मार्च** गोवर लसीकरण दिन
- **मार्च महिन्यातील दुसरा गुरुवार** – जागतिक मूत्रपिंड दिन
- **२० मार्च** जागतिक मौखिक आरोग्य दिन

### मार्च २०२४

- **२१ मार्च** जागतिक डाऊन सिंड्रोम दिन
- **२२ मार्च** जागतिक जल दिन
- **२३ मार्च** जागतिक हवामान दिन
- **२४ मार्च** जागतिक क्षयरोग दिन

### एप्रिल २०२४

- **१ ते ७ एप्रिल** अंधत्व प्रतिबंध सप्ताह
- **२ एप्रिल** जागतिक ऑटीझम जनजागृती दिन
- **७ एप्रिल** जागतिक आरोग्य दिन
- **११ एप्रिल** जागतिक सुरक्षित मातृत्व दिन
- **१४ एप्रिल** आयुष्यमान भारत–आरोग्यवर्धिनी केंद्र दिन
- **१७ एप्रिल** जागतिक हेमोफिलीया दिन
- **१९ एप्रिल** जागतिक यकृत दिन
- **२२ एप्रिल** पृथ्वी दिन
- **२४ ते ३० एप्रिल** जागतिक लसीकरण सप्ताह
- **२५ एप्रिल** जागतिक हिवताप दिन

## वर्गणीदारांसाठी हा बदल अवश्य लक्षात ठेवावा

- वर्गणीदाराने आपला संपूर्ण पत्ता, ईमेल आयडी व संपर्कासाठी दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक सुवाच्य अक्षरात, पिनकोडसह पाठवावा. सोबत अपूर्ण पत्ता असल्यास आरोग्य पत्रिका न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेची वर्गणी पाठविताना यापूर्वी आपण धनादेश पाठवीत होतात. आता त्यात बदल झाला असून केवळ मनीऑर्डरने वर्गणी खालील नावे पाठविण्यात यावी अथवा ती कार्यालयात रोखीने स्वीकारली जाईल.
- प्रशासकीय अधिकारी, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 410006.

**(या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ व शासन सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखातील विषयाबाबत अधिक माहितीसाठी कृपया लेखकांशी संपर्क**

**पत्र व्यवहारासाठी पत्ता**

मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक
आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,
परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन

## सार्वजनिक आरोग्य विभागाचा क्रांतिकारी निर्णय

## सर्व नागरिकांना मिळणार

# मोफत वैद्यकीय उपचार



## येथे मिळणार मोफत आरोग्य सेवा

- जिल्हा रुग्णालय
- सामान्य रुग्णालय
- सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल (नाशिक, अमरावती)
- संदर्भ सेवा रुग्णालय
- स्त्री रुग्णालय
- उपजिल्हा रुग्णालय
- ग्रामीण रुग्णालय
- प्राथमिक आरोग्य केंद्र
- आरोग्यवर्धिनी केंद्र

**लवकर निदान, मोफत उपचार, निरोगी ठेवा आपला परिवार**

Registered
Maharashtra Arogya Patrika (Marathi)
**RNI No. MAHMAR/2000/1736**
The date of Publication is 20th January 2024
Posting on 24th of January 2024

प्रति,

पोस्टमन बंधुनो, या पत्यावर वर्गणीदार मिळत नसेल तर हा अंक कृपया आरोग्य विभागाच्या संबंधित आरोग्य केंद्र रुग्णालय किंवा आरोग्य सेविका/कर्मचारी आशा यांचेकडे द्यावा



# सार्वजनिक आरोग्य सेवा
# महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

## टोल फ्री

| क्रमांक | सेवा |
|---|---|
| 108 | आपत्कालीन वैद्यकीय सेवा |
| 104 | आरोग्य विषयक सल्ला, तक्रार निवारण, मानसिक आरोग्य सल्ला |
| 102 (मुंबई वगळता सर्व ठिकाणी कार्यान्वित) | जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम - मोफत संदर्भ सेवा वाहतूक |
| 155388<br>1800 233 2200 | महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना |
| 1800 233 4475 | गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी) |
| 91-11-2397 8046 | राष्ट्रीय कॉल सेंटर आरोग्य विषयक माहिती |
| 1075<br>91 11 23978046 | ई-संजीवनी आरोग्य विषयक तज्ज्ञ यांचा सल्ला |
| 1800 500 0019 | मानसिक आरोग्य पुनर्वसनासाठी सल्ला |
| 1075,104 | कोविड-19 विषयक मार्गदर्शन |
| 1800 11 2356 | व्यसनमुक्ती विषयक मार्गदर्शन |
| 1800 11 6666 | क्षयरोग विषयक मार्गदर्शन |
| 022-24114000 | कुष्ठरोग विषयक मार्गदर्शन |
| 8080809063 | महिला व बाल विकास विषयक सेवा |
| 1077 | आपत्ती व्यवस्थापनासाठी मार्गदर्शन |
| 14416 | मानसिक आरोग्य |

**सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन**
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग द्वारा प्रकाशित

Monthly Maharashtra Arogya Patrica is printed and published by Dr. Kailas B. Baviskar on behalf of Public Health Department, Government of Maharashtra It is Printed at Kalyani Corporation, 1464, Sadashiv Peth, Pune 30. and Published at Maharashtra State Health I.E.C. Bureau, Parivartan', Arogya Bhavan Compound, Opp. Vishrantwadi Police Station, Yerawada, Pune 411 006.